**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती शोभा मनोहरराव गोमारे (दुड्डे),<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी तथा<br>नगर अभियंता, नगर परिषद, लातूर<br>२. जन माहिती अधिकारी तथा<br>मालमत्ता व्यवस्थापक,<br>नगर परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -१) नगर अभियंता, महानगरपालिका, लातूर (२) मालमत्ता व्यवस्थापक, महानगरपालिका, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एन.एम.देशमुख, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपायुक्त, महानगरपालिका, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख दि. २९.११.२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११.०१.२०११

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २३.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज देखील अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती नगर परिषदेच्या दोन विभागाकडे म्हणजे नगर अभियंता व मालमत्ता व्यवस्थापक यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यापैकी जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक यांनी अपिलार्थीस दि.०९.०९.२०१० रोजीच्या पत्रान्वये ₹९०५६/-शुल्काचा भरणा करावा, असे कळविले आहे. अपिलार्थी प्रत्यक्ष माहिती घेणार आहेत. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्याचे दिसत नाही. जन माहिती अधिकारी क्र.२ तथा नगर अभियंता यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या विभागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस दि. १६.०९.२०१० रोजी दाखविली आहे. यासंदर्भातील नोंद त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

प्रसंगावशात या कालावधीमध्ये अपिलार्थी या नगर परिषदेअंतर्गत नगरसेवक म्हणून कार्यरत होत्या तसेच सर्व विभाग म्हणजे मालमत्ता विभाग, मिटींग विभाग व बांधकाम विभाग या सर्व विभागाच्या अभिलेखांची पाहणी अपिलार्थी यांनी केलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादात पुढे आयोगासमोर कथन केले.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. त्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी लातूर नगर परिषदेअंतर्गत बांधण्यात आलेले सर्व व्यापारी संकुल व बी.ओ.टी.तत्त्वावर बांधण्यात आलेले सर्व व्यापारी संकुल याबाबत विविध मुद्यांद्वारे माहिती मागितलेली आहे. त्यामध्ये मंजूर आराखडे,नकाशा, शासन मान्यताप्रत, करारनामा प्रत, बांधकाम पूर्णत्त्वाचे प्रमाणपत्र, हस्तांतरण केलेल्या गाळेधारकांची मूळ यादी, त्यासंदर्भातील कागदपत्रे, करारनामाप्रत, मालमत्ता विभागातील प्रत्येक संकुलातील प्रत्येक गाळयाच्या मूळ संचिकेची छायाप्रत, या गाळयांसंदर्भात वेळोवेळी झालेल्या बैठकांचे इतिवृत्तांत व नगर परिषदेचे ठराव - या मुद्यांचा समावेश आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, बी.ओ.टी. तत्त्वावरील अशा प्रकारची एकूण ६ व्यापारी संकुले आहेत. नगर परिषदेमधील बी.ओ.टी. तत्त्वावर बांधलेल्या संकुलांची माहिती मोठया स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती

अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.अपिलार्थी यांना संचिकेची पाहणी देण्यात आली आहे असे दिसून येत आहे. तसेच ₹९०५६/- शुल्काचा भरणा करावा असेही विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. या माहितीकरिता अपिलार्थी यांनी पंधरा दिवसांचे आत शुल्क भरणा करावा तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महानगरपालिका, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती शोभा मनोहरराव गोमारे (दुड्डे),रा.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कारनाळे नारायण नागनाथ, : अपिलार्थी
रा.उजना, पो.गंगाहिप्परगा,ता. अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय समाज कल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त, समाजकल्याण, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. आर.एम.शिंदे, समाजकल्याण अधिकारी,वर्ग-२ | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सुर्यवंशी आर.डी. कनिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.११.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३.०१.२०११

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २३.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आज रोजी प्रकरणात पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०३.०९.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये २२ मुद्यांवर सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रम शाळा तुळशीराम तांडा, ता. अहमदपूर, जि.लातूर संदर्भात विस्तृत माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन १९९९ ते अपिलार्थी यांनी अर्ज दाखल केल्यापर्यंतची (दि. ०३.०९.२०१०) असा आहे. सदरच्या माहितीची व्याप्ती विचारात घेता माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. तदनंतर माहिती दि. ०४.१२.२०१० रोजी विनामूल्य दिली आहे.

अपिलार्थी मागील सुनावणीच्या वेळी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्याकरिता संधी देण्यात आली होती.तथापि ते आजही अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता सदरची माहिती एका महिन्यात संकलीत करुन देणे शक्य झाले नाही, हा जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद योग्य आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांना त्यानंतर माहिती एकत्रित करुन देण्यात आलेली आहे.

प्रसंगावशात आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, अपिलार्थी यांनी आजपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात १०-१२ माहितीचे अर्ज तसेच आयोगाकडेही बरीच द्वितीय अपिले सादर केलेली आहेत. या बाबीची आयोगातर्फे नोंद घेण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.कारनाळे नारायण नागनाथ, मु.उजना, पो. गंगाहिप्परगा, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाजकल्याण, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.शेषेराव शिवाजी कच्छवे, : अपिलार्थी
रा. कोकणगा, ता.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०१९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०७.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ११.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता.आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी देखील सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२३.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेषेराव शिवाजी कच्छवे, मु.कोकणगा, पो.ता.अहमदपूर, जि.लातूर-४१३ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर, | : | अपीलकर्ता |
| | मु. पो. गंगापूर, तालुका जिल्हा लातूर | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | | |
| | - श्री. एस. ए. हराळे | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | | |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बी. एस. पाटील, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०१-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०२-२०१० फेरसादर दि. १९-०४-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी वकिलासह, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या विनंतीवरुन त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेल्या दारिद्र्य-रेषेखाली समाविष्ट करण्याकरिता केलेल्या कुटूंब मुल्यांकन अहवालाची प्रत मागितली आहे. सदर मुल्यांकनाची प्रत. इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध आहे परंतु अपिलार्थी यांना ही प्रत मराठी भाषेतील हवी आहे. याकरिता विशेष बाब म्हणून जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रत मराठीमध्ये भाषांतरीत करुन घेतली आहे , ती प्रत आज रोजी आयोगासमोर अपिलार्थीस देण्यात आली आहे. कुटूंब पत्रकाची प्रत शोध घेऊनही सापडली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

या करिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर, मु. पो. गंगापूर, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अंकुश धोंडिबा पाटील,<br>रा. बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर<br>- श्री. पाटील व्ही. आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मंडळ अधिकारी, बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर<br>- श्री. एस. डी. पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २५-११-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत दिनांक २४-१२-२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार आहे, ती कार्यालयामध्ये येऊन घेऊन जावी असे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी यांनी माहिती व्यक्तिशः प्राप्त केलेली आहे व त्याची पोच त्यांच्या दप्तर दाखल आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणीच्या वेळी सुध्दा अपिलार्थीस पुन्हा माहिती देण्यात आली आहे. दिनांक ०७-०३-२०१० रोजी अपिलार्थी यांनी प्रत्यक्ष माहिती घेतली आहे. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दोनदा देण्यात आली आहे. तथापि ते अनुपस्थित राहिलेले आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकुश धोंडिबा पाटील, रा. बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी
रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सजा शिवणखेड (बु.), तालुका चाकूर,
जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, वडवळ (ना.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा शिवणखेड (बु.), तालुका चाकूर,<br>जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, वडवळ (ना.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-११-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०३-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुध्दा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही याकरिता प्रकरणात तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांनी या प्रकरणात लक्ष घालून अपिलार्थीस माहिती दिल्याची खातरजमा करावी. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती याचा विचार करुन अपिलार्थीस अद्याप माहिती दिली नसल्यास ती देण्याची व्यवस्था करावी. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची दोनदा संधी देण्यात आली आहे तथापि ते सुनावणीस अनुपस्थित राहिले आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा शिवणखेड (बु.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, वडवळ

(ना.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. व्ही. एस. आकणगिरे, : अपिलार्थी
अखिल भारतीय सेना, शाखा रेणापूर, तालुका रेणापूर,
ता. अ., जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य पुणे, डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत,
पुणे - १

जन अपिलीय अधिकारी, :
प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे,
डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत, पुणे - १

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण संचालनालय,<br>महाराष्ट्र राज्य पुणे, डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत,<br>पुणे - १ - श्री. के. पी. देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण सह संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय,<br>महाराष्ट्र राज्य पुणे, डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत,<br>पुणे - १ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०२-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०४-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांचा दिनांक ०८-०२-२०१० रोजीचा माहिती अर्ज दिनांक १६-०२-२०१० रोजी त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला आहे. दिनांक ०९-०३-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. मागील सुनावणीस सुध्दा अनुपस्थित होते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे. तथापि काही माहिती अपूर्ण व चुकीची दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे, नेमके नमूद केलेले नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. व्ही. एस. आकणगिरे, अखिल भारतीय सेना, शाखा रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत, पुणे - १ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत, पुणे - १ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण भगवान गोसावी, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय,मुरुड, ता.जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नारायण भगवान गोसावी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,मुरुड, ता.जि.लातूर- श्री.के.डी.पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर- श्री. एस.ए.हराळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |

यापूर्वी या प्रकरणात दि. ०५.०८.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे

सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मालमत्तेमधील काही भाग दानपत्र करुन दिला. त्यातील उर्वरित मालमत्तेबाबत ८-अ च्या उताऱ्याची प्रत अशी माहिती मागितली आहे.ही माहिती त्यांना मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी ज्या दिवशी माहितीचा अर्ज दाखल केला होता, त्या दिवशी अशाप्रकारे त्यांनी मागितलेल्या माहितीप्रमाणे त्यांच्या मालमत्तेतून वजावट करुन व त्याबाबतची मोजणी प्रलंबित होती त्यामुळे ८-अ चा उतारा उपलब्ध नव्हता आता प्रक्रिया पूर्ण झाली असून ८-अ ची प्रत तयार करण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली माहिती आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आली.अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण भगवान गोसावी, द्वारा विनायक दामोदर सावरकर सहकारी पतसंस्था, उषाकिरण कॉम्प्लेक्स, बार्शी रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय,मुरुड, ता.जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख सादीक पिता खाजामियाँ, : अपिलार्थी

रा. लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय,उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख सादीक पिता खाजामियाँ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अंतर्गत लेखा परिक्षक,नगर परिषद कार्यालय,उदगीर,जि.लातूर- श्री. व्ही. के. आंबेसंगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर - श्री. एस.टी.चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०५.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आज रोजी प्रकरणात पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी सन १९६३ सालाची त्रयस्थ व्यक्तीची सेवाविषयक माहिती मागितली आहे. माहिती सन १९६३ सालची असल्यामुळे संचिकेचा शोध घेऊनही उपलब्ध न झाल्यामुळे अपिलार्थीस देता आली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले. याकरिता मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांनी दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन माहितीचा पुन्हा एकदा शोध घेऊन माहिती उपलब्ध होताच जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी व उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे कळवावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांनी दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन माहितीचा पुन्हा एकदा शोध घेऊन माहिती उपलब्ध होताच जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी व उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे कळवावे.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख सादीक पिता खाजामियॉ, राज महंमद दर्गा रोड, उदगीर, जि. लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परिक्षक,नगर परिषद कार्यालय,उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुनिल हरिबा मंदाडे,रा.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नगर अभियंता,<br>नगर परिषद कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुनिल हरिबा मंदाडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता, महानगरपालिका, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. देशमुख एन.एम., शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त, महानगरपालिका, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.११.२०१० (फेरसादर) |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि.०९.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटल्याने आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे सन २००९ मध्ये लातूर नगर परिषद हद्दीतील गट नं. २३३-२/२ मधील सुभाषनगर भागातील महादेव मंदिराच्या जागेमध्ये केलेल्या वृक्षारोपणासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्यापैकी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दि. ०६.०३.२०१० रोजी माहिती मिळाली आहे व त्यामध्ये किती झाडे लावली व त्याबाबतचे अंदाजपत्रक  व नकाशाची प्रत मिळाली नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी यांनी अभिलेखाची पुन्हा तपासणी करावी व माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

प्रसंगावशात पर्यावरणाच्या दृष्टीने महानगरपालिकेतर्फे हाती घेण्यात येत असलेल्या वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमास अनन्यसाधारण महत्त्व आहे. झाडे लावल्यानंतर ती जगवणे ही बाब देखील महानगरपालिकेने पाहणे गरजेचे आहे. अशा उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये आयोगास व्यापक जनहित दिसून येत आहे. याकरिता भविष्यात अशाप्रकारचे कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी दोन झाडांमधील अंतर, झाडे जोपासण्याकरिता हाती घेतलेल्या उपाययोजना जसे संरक्षक जाळी इ.बाबी साकल्याने विचारात घेणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. अशा उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी परफॉर्मन्स कॉन्ट्रॅक्ट करणे अत्यंत जरुरी आहे. अशा प्रकारे परफॉर्मन्स कॉन्ट्रॅक्टद्वारे झाडे मोठी, सुस्थितीत झाल्यानंतर कंत्राटाच्या एकूण रकमेतील काही रक्कम अदा करणे उचित ठरेल. याकरिता एक अभ्यासगट महानगरपालिका, लातूर यांनी त्यांच्या स्तरावर करावा व एक कार्यप्रणाली निश्चित करावी, अशी शिफारस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 25(3)(g)अन्वये आयोगास प्राप्त अधिकारानुसार करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त,महानगरपालिका,लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भातील कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

२)  आयुक्त, महानगरपालिका, लातूर यांना वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे कार्यप्रणाली निश्चित करण्याबाबत अधिनियमातील कलम 25(3)(g) नुसार आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १६-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल हरिबा मंदाडे, काळे गल्ली, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव, : अपिलार्थी
रा.भोकरंबा, ता.रेणापुर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
भगतसिंग विद्यालय, पळशी, ता.रेणापूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | सध्याचे जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, ता.रेणापुर, जि.लातूर -श्री. वाघचौरे व्ही.एम. | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. कदम एम.एस | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचे वकील उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये इयत्ता ५ वी ते ९ वीतील विद्यार्थ्यांच्या सर्व घटक चाचण्या व दोनही सत्र परीक्षेच्या विविध विषयावरील उत्तरपत्रिकांच्या प्रतींची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांचे परीक्षा क्रमांकही नमूद केले आहेत. अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 8(1)(j)नुसार सदरची माहिती अपिलार्थीस देय होणार नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव, मु.पो.भोकरंबा, ता.रेणापुर, जि.लातूर
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, ता.रेणापुर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र,<br>रा.रायवाडी, पो.महाळंगी, ता.चाकूर,जि. लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी सजा महाळंगी, ता.चाकूर,जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, झरी (बु.),<br>ता.चाकूर,जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, सजा महाळंगी, ता. चाकूर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मंडळ अधिकारी, झरी (बु.), ता.चाकूर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | विशेष साक्ष - तहसीलदार, चाकूर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.५ | विशेष साक्ष - उपविभागीय अधिकारी, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.६ | श्री.एन. के. आलूरे, लिपीक, उपविभागीय अधिकारी कार्यालय,उदगीर, जि.लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४.१२.२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत करुन देण्यात आले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ व्यक्तीसंदर्भात असून सदर त्रयस्थ व्यक्ती एक निराधार महिला आहे. या त्रयस्थ व्यक्तीच्या जमिनीवर खोटा फेरफार झाला आहे,अशी अपिलार्थी यांची धारणा आहे. याकरिता त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मौ. रामवाडी येथील गट क्र.३१ चा ७/१२, फेर क्र. ३५९ च्या प्रती व त्यासंदर्भातील इतर माहिती मागितली आहे. त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे की, अपिलार्थीने माहितीच्या अधिकारातील अर्ज जन माहिती अधिकारी, तलाठी सजा महाळंगी कार्यालयात रितसर अर्ज करुन आवश्यक ती माहिती हस्तगत करुन घ्यावी. त्याचप्रमाणे आयोगास अवगत करुन देण्यात आले की, प्रकरणात अपिलार्थी यांचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेला नाही.

या सर्व बाबी विचारात घेता, आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता व त्यानुसार अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यासह तहसीलदार, चाकूर जि.लातूर तसेच उपविभागीय अधिकारी,उदगीर, जि.लातूर यांना विशेष साक्षीसाठी पुढील सुनावणीस उपस्थित राहण्याचे सूचित करण्यात आले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच तहसीलदार, चाकूर व उपविभागीय अधिकारी, उदगीर,जि.लातूर निवडणूकीच्या कामामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी पुढील सुनावणी दि. २३.०३.२०१२ रोजी आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २३.०३.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी तसेच तहसीलदार, चाकूर,जि.लातूर व उपविभागीय अधिकारी, उदगीर, जि.लातूर यांनी विशेष साक्षीसाठी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र, रा.रायवाडी, पो. महाळंगी, ता. चाकूर, जि. लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, महाळंगी, ता.चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, झरी (बु.), ता.चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. उपविभागीय अधिकारी, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.तुळजाराम एकनाथ फुलारी (रोहिणेकर), : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,चाकूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, चाकूर, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११०४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.तुळजाराम एकनाथ फुलारी (रोहिणेकर) | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.१२.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता.प्रकरणात आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित

आहेत.त्यांनी निवडणूकीच्या कामामुळे उपस्थित राहू शकत नाहीत त्यामुळे पुढील तारीख देण्याची पत्राद्वारे विनंती केली आहे.

अपिलार्थी यांनी युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, मौ.रोहिणा, तालुका चाकूर येथील गट नंबर २४३ संदर्भात चुकीची नोंद असलेला ७/१२ चा उतारा मिळाला आहे. सन २००४ मध्ये वेगळी नोंद आहे व झालेला फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झालेला आहे, त्या कागदपत्रांच्या प्रती मागत आहेत. त्यांना कागदपत्रे मिळालेली नाहीत. सदरची कागदपत्रे अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करण्यासाठी व जन माहिति व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख देण्याचा आयोगातर्फे निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २२.०३.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्री.तुळजाराम एकनाथ फुलारी (रोहिणेकर), रा. श्रीकृष्णनगर, सम्राट चौक, लातूर-४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
रा.टेंभुर्णी, पो.ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (निवडणूक),
तहसील कार्यालय,गंगाखेड, ता.गंगाखेड,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,गंगाखेड, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११०६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०९.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी निवडणूकीच्या कामामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२०.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, रा.टेंभूर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक),तहसील कार्यालय, गंगाखेड,ता.गंगाखेड,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सफियोद्दीन वलीयोद्दीन काझी, : अपीलकर्ता
सिव्हिल कोर्टाच्या पाठीमागे, गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी
कार्यालय, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी ॲडव्होकेट श्री. अनिरुध्द टिकले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी<br>कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०३-२०११ |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीराम कन्हेयालाल भंडारी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. सुर्यवाड व्ही. जे, लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक १६-०९-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये सोसायटीच्या जमिनीबाबत माहिती मागितली आहे. त्या जमिनीवर अतिक्रमण झाले असल्याने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. त्यांना ही माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही.तसेच त्यांच्या दिनांक १७-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे की, आपला माहितीचा अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला नाही. प्रथम अपिलाचे अवलोकन केले असता अर्जातील मजुकराचा बोध होत नाही म्हणून अर्ज निकाली काढण्यात येत आहे व आपणास जी माहिती हवी आहे त्याबाबत दुसरा अर्ज देऊन नियमाप्रमाणे माहिती हस्तगत करावी . ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक होते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०२-२०१२ रोजीच्या पत्रान्वये निवडणुकीच्या कामामुळे सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. या सर्व प्रकरणात सद्यस्थिती अवगत करण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) श्री. बी. पी. कुलकर्णी व तहसीलदार श्री. शरद झाडके यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.याकरिता प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात येत आहे.पुढील सुनावणीच्या वेळी सर्व संबधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात आहे. पुढील सुनावणी दिनांक २१-०३-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीराम कन्हेयालाल भंडारी, जगमित्र नागा को-ऑप. हौऊसिंग सोसायटी, परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण सोपानराव जगताप,<br>रा. भाग्यलक्ष्मी मेडिकल, कारंजा, जुनी भाजी मंडई रोड,<br>बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पोलीस प्रमुख कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण सोपानराव जगताप | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पोलीस प्रमुख कार्यालय, बीड, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती दिनांक १०-१०-२००९ रोजी देण्यात आली आहे असे दिसून येत आहे. ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली आहे व स्वच्छेने व्दितीय अपील मागे घेण्याकरिता अनुमती देण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थी यांची ही विनंती आयोगाने मान्य केली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण सोपानराव जगताप, रा. भाग्यलक्ष्मी मेडिकल, कारंजा, जुनी भाजी मंडई रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख कार्यालय, बीड, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.गणेशसिंग सखारामसिंग परदेशी, : अपिलार्थी
रा.पिंपळनेर, ता.जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत पिंपळनेर(ग), ता.जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिति, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.गणेशसिंग सखारामसिंग परदेशी | : उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे मदतनीस श्री. मदनसिंग धरमसिंग परदेशी | : उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०९.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे मदतनीस उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत, पिंपळनेर(ग), ता.जि.बीड यांच्याकडून मिळकत क्रमांक ३२० संदर्भात त्रयस्थ श्री. गणेश आसाराम सावंत यांचे नाव नमुना नं.८-अ च्या उताऱ्यावर लावण्यात आले तसेच क्षेत्रफळ अधिक क्षेत्र दाखविण्यात आले, ही कार्यवाही कोणत्या कागदपत्रांच्या आधारे केली, याची माहिती मागितली आहे. ती मुदतीत कळविली नाही. त्यामुळे अपिलार्थीस दावा दाखल करता आला नाही. त्यांना आजपर्यंत माहिती मिळालेली नाही. या वाढीव क्षेत्रामध्ये अपिलार्थी यांच्या जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे, अशी त्यांनी त्यांची बाजू मांडली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दि. २८.१२.२०१० रोजी काही माहिती दिली गेली आहे. ही माहिती त्यांना दि. १२.०१.२०११ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांनी जी माहिती मागितली ती न देता दुसरीच माहिती दिलेली आहे.

या सर्व बाबी पाहता, सकृतदर्शनी प्रकरणामध्ये अतिक्रमणाची बाब दिसून येत असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी या प्रकरणात व्यक्तिशः लक्ष घालून अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, त्यांना देण्यात आलेली माहिती या बाबींची तौलनिक पाहणी करावी व चुकीची माहिती दिली असल्यास संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध अभिलेखावरुन आवश्यक माहिती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्यात येईल याचीही व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.गणेशसिंग सखारामसिंग परदेशी, रा. पिंपळनेर(ग), ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत पिंपळनेर(ग), ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. चाटेकर राजेश लिंबराज,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अप्पर जिल्हाधिकारी, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चाटेकर राजेश लिंबराज | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वडील-श्री. एल.जी.चाटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बीड-श्री. मगन गोपीचंद राठोड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, बीड | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. टी.वाय. जाधव,सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांच्या मदतीसाठी त्यांचे वडील, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व सादर केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी प्रकल्पग्रस्त नोंद केलेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्येष्ठता क्रमांक कळवावा, ही माहिती मागितली आहे.

त्यानुसार अपिलार्थीस दि. १५.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये कलम ७(१) नुसार विहित मुदतीत नोंदणी क्र. ७८/२००० असा कळविण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. तथापि त्यांनी सुनावणीच्या वेळी युक्तिवादात कथन केले की, या माहितीचे रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस सर्व रजिस्टर्स दाखविण्यात आले व अपिलार्थीस क्रमांक कळविण्यात आला आहे.अपिलार्थी यांना ७८/२००० हा क्रमांक कोणत्या रजिस्टरच्या आधारे कळविला, ते रजिस्टर जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेले आहे. त्यामधील संदर्भित पृष्ठाची एक प्रत अपिलार्थीस आयोगाच्या सूचनेनुसार देण्यात आली. अपिलार्थीची यासंदर्भात काही तक्रार असल्यास ते संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे वेगळयाने अर्ज करु शकतात.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चाटेकर राजेश लिंबराज, पोलीस मुख्यालयासमोर, नगर रोड, बीड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद अनीसोद्दीन सय्यद सलाहोद्दीन, : अपिलार्थी
रा.अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
मा.शरदचंद्रजी पवार ऊर्दू प्राथमिक शाळा,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, मा. शरदचंद्रजी पवार ऊर्दू प्राथमिक विद्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.जी. माने, अधीक्षक,वर्ग-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६.०२.२०१०

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. १५.०२.२०१२ रोजीचे पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले की, त्यांनी अपील केल्याच्या दोन दिवसानंतर त्यांना हवी असलेली माहिती बोलावून दाखविली व ती माहिती पाहिल्यानंतर त्यांचे समाधान झाले आहे. त्यामुळे अर्ज मागे घेत आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद अनिसोद्दिन सय्यद सलाहोद्दीन, गांधीनगर, अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मा. शरदचंद्रजी पवार ऊर्दू प्राथमिक विद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे,<br>रा.उंदरी, ता.केज, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव,श्री शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय,<br>उंदरी, ता.केज, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>ग्रंथालय सहायक संचालक,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी -श्री.त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सचिव,श्री शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय,उंदरी, ता.केज, जि.बीड - श्री. दामोदर हरिभाऊ लांडगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद - श्री.सुहास रामचंद्र रोकडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे, असे दिसून येत आहे.

१) सन २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ या कालावधीमध्ये ग्रंथालयास प्राप्त झालेल्या निधीचा तपशील.

२) या कालावधीमध्ये कर्मचाऱ्यांचे पगार, नाव व स्वाक्षरीसह यादी.

३) वाचनालयाच्या पुस्तकांची यादी.

४) सन २००८-०९ या कालावधीमध्ये झालेल्या कार्यकारी मंडळ बैठकीच्या ठरावाच्या प्रती.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, सदरचे ग्रंथालय 'ब' वर्गात मोडते. प्रतिवर्षी या ग्रंथालयास ₹१,२८,०००/- अनुदान प्राप्त होते. सभासद वर्गणी इ.मिळून ₹१,८०,०००/- एवढी रक्कम होते म्हणून सदरचे वाचनालय अधिनियमातील कलम 2(h) नुसार सार्वजनिक प्राधिकरण होत आहे व माहिती अधिकार अधिनियम लागू होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांचे ३-४ अर्ज आहेत. प्रत्येक अर्जासंदर्भात त्यांनी शुल्काची रक्कम कळविलेली आहे. या माहिती अर्जासंदर्भातील शुल्काची रक्कम त्यांना कळविलेली आहे. या माहिती अर्जासंदर्भात त्यांनी दि. ०९.०९.२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केल्यावर ₹२६००/- शुल्काचा भरणा एकूण १३०० पृष्ठांसाठी करावा, असे कळविले आहे.अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांनी यापूर्वी ₹५००/-चा भरणा केला आहे. त्यापोटी त्यांना आजपर्यंत कोणतीही माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्यांनी दि. ०७.०८.२००९ रोजीच्या अर्जासंदर्भात शुल्काचा भरणा केलेला नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांमध्ये संभ्रम झालेला दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या सर्व अर्जासंदर्भात एकत्रित एकूण १३०६ पृष्ठांची माहिती सोबत आणली असल्याचे आयोगासमोर कथन केले. त्यातील विचाराधीन प्रकरणाशी संबंधित माहिती आज आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीच्या मदतनीसामार्फत त्यांना हस्तांतरित करण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे, मु.पो.उंदरी, ता. केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,श्री शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय,उंदरी, ता. केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्र हौसराव देशमुख,<br>रा.गेवराई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, गेवराई, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, गेवराई, जि.बीड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - भांडारपाल तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, गेवराई, जि.बीड - श्री. विष्णू पांडुरंग पवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, जि.बीड- श्री. सय्यद रफीक कंकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०६.२००९<br>(फेरसादर, दि. २७.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, दि. ०७.०३.२००९ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस दि. ३१.०३.२००९ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेली आहे.अपिलार्थीस ती प्राप्त झाल्याची पोच आहे.

प्रसंगावशात अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचारी असून सध्या निलंबित आहेत. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, जि.बीड यांनी सुनावणी घेऊन दि. १२.०५.२००९ रोजी अपील अर्ज फेटाळला आहे. आतापर्यंत अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे जवळपास १५-२० अर्ज केलेले आहेत याची, आयोगाने नोंद घेण्याची विनंती जन माहिती अधिकारी यांनी केली. अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १७-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र हौसराव देशमुख, कोल्हेर रोड, नगर परिषद कॉलनी, गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जनार्धन गोविंदराव राऊत, : अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद,
परळी वैजनाथ, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, परळी वै.जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्र. लिपीक, नगर परिषद, परळी वै.,जि.बीड- श्री.स.खय्युम स.हबिब | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, परळी वैजनाथ, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. रोडे. डी.एम., प्र.लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०९.२००९ (फेरसादर दि. ०५.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १६.०३.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १७-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.जनार्धन गोविंदराव राऊत, रा.गुरुकृपा निवास, माधवबाग, परळी वै. जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा प्र. लिपीक, नगर परिषद, परळी वै.,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.अजित एम. देशमुख, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
परीक्षा नियंत्रक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.
जन अपिलीय अधिकारी तथा :
परीक्षा नियंत्रक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - श्री. प्रताप कलावंत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - परीक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद- डॉ. अशोक मंगेश चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांचा दि. ११.०८.२००९ रोजीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दि. १८.०८.२००९ रोजी प्राप्त झाला. माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी एकत्रित १६ मुद्यांवर विद्यापीठाच्या कामकाजासंदर्भात माहिती मागितली आहे. सर्व माहिती संकलीत करुन अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दि. १६.०८.२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २३.१०.२००९ रोजी अपील निकाली काढण्याचा निर्णय दिलेला आहे.

अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये अपिलाची कारणे नमूद केली आहेत. त्यामध्ये एकूण १० मुद्दे आहेत. या मुद्यांकडे जन माहिती अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या मुद्यांची संपूर्ण माहिती दिली गेली नसल्यास त्यासंदर्भात मुद्देनिहाय उर्वरित माहिती द्यावी व दिली असल्यास तसे कळवावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती दिली गेली नसल्यास त्यासंदर्भात अपिलार्थी यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन मुद्देनिहाय उर्वरित माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी व दिली असल्यास तसे कळवावे. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १७-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. अजित एम.देशमुख, द्वारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, जि.बीड - ४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.बप्पासाहेब महादेव शिंदे, : अपिलार्थी
रा.लवुळ नं.१, ता.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
माजलगाव, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, माजलगाव, जि.बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.बप्पासाहेब महादेव शिंदे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये कथन केले की, अपिलार्थी यांनी जोडलेल्या प्रतीवरुन मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे जुने नाहीत. आतापर्यंत माहिती देण्यात

आलेली नाही. यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी या प्रकरणाची पाहणी करावी व जन माहिती अधिकारी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देतील याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी या प्रकरणाची पाहणी करुन संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड अपिलार्थीस देय होणारी माहिती हे आदेश प्राप्त होताच साठ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य देतील, याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.बप्पासाहेब महादेव शिंदे, रा.लवुळ नं.१, ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.सय्यद मुबारक अली सय्यद कासीम अली, : अपिलार्थी
रा.परळी वैजिनाथ, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
चेअरमन, कारागीर मजूर सहकारी संस्था मर्यादित, परळी वै. ता.परळी वैजनाथ, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, परळी वैजिनाथ,जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.सय्यद मुबारक अली सय्यद कासीम अली | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - चेअरमन, कारागिर मजूर सहकारी संस्था, परळी वै. जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सय्यद लियाकत सय्यद कादर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, परळी वैजिनाथ,जि.बीड - सौ.बी.एन.मुंडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३.१२.२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे.परंतु ती चुकीची आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या माहितीवरुन अपिलार्थी यांचे समाधान झाले आहे असे जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णयामध्ये नमूद केले आहे. ही बाब सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या नजरेस आणून देण्यात आली.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सय्यद मुबारक अली सय्यद कासीम अली,रा.पेठ मोहल्ला, सय्यद गल्ली,परळी वैजिनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, कारागीर मजूर सहकारी संस्था मर्यादित, पेठ मोहल्ला, सय्यद गल्ली, परळी वै. ता.परळी वैजिनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, परळी वैजिनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. प्रभावती एकनाथ राऊत, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नगर रचनाकार, महानगरपालिका, परभणी - श्री. कस्तुरे ए. व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त, महानगरपालिका,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. के. एम. जाधव, प्रशासकीय अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.१०.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.१०.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.१०.२०११ |

या प्रकरणात यापूर्वी दि. १२.०१.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

प्रकरणात आज सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.त्यांनी सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची आयोगास त्यांच्या दि.२२.०२.२०१२ रोजीच्या निवेदनाद्वारे विनंती केली आहे. त्यांची विनंती आयोगातर्फे मान्य करण्यात येऊन सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. ०३.०४.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. प्रभावती एकनाथराव राऊत, अग्नीशामक दल क्वॉर्टर,नगर परिषद,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, महानगरपालिका,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख इकबाल शेख गणी पटेल, : अपिलार्थी
रा. खुलताबाद, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, खुलताबाद,
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,
नगर परिषद, खुलताबाद, जि. औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, खुलताबाद,जि. औरंगाबाद - श्री. शेख फतेमहमद खाजा महमद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, खुलताबाद,जि. औरंगाबाद - श्री. भारत राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०१.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २२.१२.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि. २२.०२.२०१२ अशी निश्चित करण्यात आली. त्यानुसार प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. १८.१०.२०१० रोजीच्या अर्जान्वये खुलताबाद नगर परिषदेतर्फे कर्मचाऱ्यांना खुलताबाद येथील हौदडी गेटसमोरील जागा राहण्यासाठी दिल्याबाबत तसेच त्यापैकी काही कर्मचाऱ्यांनी त्या जागेची विक्री केल्यासंदर्भात माहिती मागितली आहे. त्यासंदर्भात दि. १५.११.२०१० रोजी अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, खुलताबाद यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला होता. सुनावणीच्या वेळी ही माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी मागील सुनावणीच्या वेळी अनुपस्थित होते. त्यांना बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात आली होती. आज रोजी देखील ते अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण माहिती दिली आहे असे मोघमपणे नमूद केले आहे. नेमके नमूद केले नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इकबाल शेख गणी पटेल, रा.पटेल मंडी, खुलताबाद, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,नगर परिषद, खुलताबाद,

जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद,खुलताबाद,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजमोहंम्मद हबीबुद्दीन शेख, : अपिलार्थी
जिल्हा परिषद क्वॉर्टर, घर नं. बी. १३, घाटी दवाखाना गेट समोर, पानचक्की रोड, ज्युबली पार्क, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
चेअरमन, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०४५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजमोहंम्मद हबीबुद्दीन शेख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद - श्री. रामराव मोतीराम वानखेडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०१-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०२-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०६-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद श्री. पालोदकर यांची साक्ष आवश्यक ठरत असल्याने सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०३-०४-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी साक्षीसाठी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजमोहंम्मद हबीबुद्दीन शेख, जिल्हा परिषद क्वॉर्टर, घर नं. बी. १३, घाटी दवाखाना गेट समोर, पानचक्की रोड, ज्युबली पार्क, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामराव केशवराव ठोंबरे, : अपिलार्थी
ए-६३, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालय अधीक्षक, उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०८२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक, उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद - श्री. सी. ए. ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद- श्री. व्ही. टी. मुळे | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २६-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २९-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०६-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०३-०३-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २५-०३-२०११<br>(फेरसादर दिनांक २२-०७-२०११) |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०६-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये ११ मुद्दयांवर माहिती मागितली आहे. तथापि जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत सशुल्क देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलावर दिनांक ०३-०३-२०११ रोजी सुनावणी झाली. सुनावणीमध्ये उर्वरीत माहिती विनामूल्य देण्यात यावी असा निर्णय झाला. त्यानुसार अपिलार्थीस उर्वरीत माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीने ती व्यक्तिशः घेतली आहे व त्याबाबतची पोच त्यांच्या दप्तर दाखल आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अपिलार्थी यांनी मागितलेली जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, ती देणे अभिप्रेत आहे, त्यानुसार अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी मागील सुनावणीस अनुपस्थित होते, त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि आजही ते उपस्थित राहिले नाहीत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामराव केशवराव ठोंबरे, ए-६३, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. उस्मानशाह इब्राहिमशाह,<br>ग. नं. २०, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासन शाखा प्रमुख, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०९७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - हाजी अे. पी. शाह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासन शाखा प्रमुख, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. डी. पेंडसे, लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०४-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०६-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांच्या नियुक्तीबाबतची आहे. अशा ५७० नियुक्त्या झालेल्या आहेत. त्यापैकी ७८ लोक अपात्र ठरले आहेत, याबाबतची चौकशी झाली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ०१-०२-२०१२ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, अपिलार्थीस अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसात द्यावी, असा निर्णय दिला आहे त्यानुसार दिनांक ०७ एप्रिल २०११ च्या पत्राने तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी माहिती दिलेली आहे. त्याबाबतची पोच अपिलार्थीने दिली आहे त्यामध्ये त्यांनी माहिती अपूर्ण दिली, असे नमूद केले आहे.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की,अनेक ठिकाणी अपात्र लोकांच्या स्वांतत्र्य सैनिकांचे पाल्य म्हणून नियुक्त्या झालेल्या आहेत त्यामुळे या माहितीमध्ये व्यापक जनहित असल्याने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना काही माहिती मिळाली आहे परंतु काही माहिती अप्राप्त आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य म्हणून नियुक्ती झालेले कर्मचारी ज्या शासकीय कार्यालयात काम करीत आहेत तेथील पत्ते अपिलार्थीस कळवावे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उस्मानशाह इब्राहिमशाह, ग. नं. २०, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन शाखा प्रमुख, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुर्यप्रकाश ताराचंदजी बन्सवाल, : अपिलार्थी
अग्रवाल किराणा स्टोअर्स शेजारी, सोनार गल्ली,
पदमपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस उपायुक्त परिमंडळ, औरंगाबाद शहर, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३९६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुर्यप्रकाश ताराचंदजी बन्सवाल | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, औरंगाबाद<br>- श्री. नरेश मेघराजानी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त परिमंडळ, औरंगाबाद शहर, औरंगाबाद<br>- डॉ. जय जाधव | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-११-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २०-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी त्यांचे प्रतिनिधी सह व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-१२-२०११ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात त्यांना खालीलप्रमाणे माहिती मिळाली नाही असे आयोगास कथन केले.

१. पोलीसाविरुध्द अपिलार्थी यांनी खोट्या तक्रारी केल्या आहेत असा त्यांच्यावर आरोप आहे ज्या तक्रारी केल्या आहेत त्याच्या प्रती व त्यावर केलेली कार्यवाही. (मुद्दा क्रमांक २)

२. अपिलार्थी यांनी ज्या तक्रारी केल्या आहेत त्याबाबतच्या तारखा नमूद केल्या आहेत, त्याच्या चौकशी अहवालाच्या प्रती. (मुद्दा क्रमांक ६)

३. दिनांक ११-१२-२००९ रोजी अपिलार्थी यांनी दिलेल्या तक्रार अर्जानुसार केलेल्या कार्यवाहीच्या प्रती. (मुद्दा क्रमांक ७)

४. दिनांक २५-०८-२००९ रोजी केलेल्या अर्जावरील चौकशी अहवालाची प्रत.

५. राजकीय नेत्यांव्दारे सामान्य मानसावर दबावतंत्र अवलंबवण्याबाबत कायद्यात रितसर तरतूद आहे किंवा नाही, याबाबतची लेखी माहिती (मुद्दा क्रमांक १०)

६.. राज्य मानवी हक्क आयोगाने दिलेल्या आदेशानुसार केलेल्या चौकशीची प्रत. (मुद्दा क्रमांक ११)

७. अर्जदाराने माहिती विचारु नये याकरिता अप्रत्यक्ष तंत्राचा वापर करण्याबाबत कायद्यात रितसर तरतूद आहे किंवा नाही, याबाबतची लेखी माहिती (मुद्दा क्रमांक १२)

८. मुद्दा क्रमांक १४ मध्ये त्रयस्थ पोलीस कर्मचा-याची माहिती आहे ती त्यांना प्राप्त झाली नाही.

९. मुद्दा क्रमांक १३ ची माहिती प्राप्त झाली नाही ही माहिती देणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी सन १९९१ ते अर्ज करण्याच्या दिनांका-पर्यंतचा आहे. अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक १४-०६-२०१० रोजी ५२ पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे. मुद्दा क्रमांक १४ मध्ये अपिलार्थीने त्रयस्थांची वैयक्तिक माहिती मागितली असल्याने व

त्रयस्थांनी त्यांची वैयक्तिक माहिती देण्यात येऊ नये अशी भूमिका घेतल्याने सदर माहिती देता येत नाही, असे अपिलार्थी यांना दिनांक १४-०७-२०१० रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १७-०८-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना सर्व माहिती समक्ष देण्यात आल्याने, त्यांचे समाधान झाल्याने व अपील निकाली काढल्याचे मान्य केल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. मुद्दा क्रमांक ९ ची माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणीच्या वेळी देऊ केली असता अपिलार्थी यांनी ती स्विकारण्यास नकार दिला. तथापि युक्तिवादात अपिलार्थी यांनी ती माहिती देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याबाबत एकूण ९ मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यातील मुद्दा क्रमांक १०, १२ व १३ बाबतची माहिती लेखी स्वरुपात मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केलेल्या “माहिती” च्या व्याख्येमध्ये अशी माहिती येत नाही तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे तशीच देय होते. माहितीचे संस्करण करुन देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस देय होणार नाही.अपिलार्थी यांनी मुद्दा क्रमांक १४ मध्ये त्रयस्थांची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 8 (1) (j) मध्ये नमूद केलेल्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे माहिती देय होणार नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात अपूर्ण माहिती मिळाली असे नमूद केले आहे. त्यातील मूळ अर्जानुसार मुद्दा क्रमांक १०, १२, १३ व १४ बाबतची माहिती देय नाही म्हणून वगळता अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात वर नमूद केलेली माहिती (मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ६, ७ व ११ तसेच दिनांक २५-०८-२००९ रोजी केलेल्या अर्जावर चौकशी अहवालाची प्रत) त्यांना देय होते ती पूर्वी दिली नसल्यास व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास त्याच्या प्रती देण्यात याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यप्रकाश ताराचंदजी बन्सवाल, अग्रवाल किराणा स्टोअर्स शेजारी, सोनार गल्ली, पदमपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ, औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहमद अब्दुल फहीम,<br>फ्लॅट नं. २, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>वॉर्ड ई कार्यालय, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहमद अब्दुल फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वॉर्ड अधिकारी, वॉर्ड ई कार्यालय, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. चव्हाण एन. एल. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सी. एम. अभंग | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे - प्रतिनिधी - श्री. सदानंद खन्ना, मालमत्ता अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०८-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-१२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २०-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०६-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहमद अब्दुल फहीम, फ्लॅट नं. २, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, वॉर्ड ई कार्यालय, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उत्तम नामदेव दणके, : अपिलार्थी
आंबेडकरनगर, गल्ली नंबर ८, एन ७, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा व्यवस्थापक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, प्लॉट नं. २५, श्री. चंद्रकांत नलावडे यांची बिल्डींग, पहिला मजला, दुर्गामाता मंदिरासमोर, भानुदासनगर, जवाहर कॉलनी रोड, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, लाम्बा निवास, पदमपाणी कॉलनी, व्दारका हॉटेलच्या पाठीमागे, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४१०

२ सुनावणीची तारीख दि. २२-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. उत्तम नामदेव दणके : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
जिल्हा व्यवस्थापक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, प्लॉट नं. २५, श्री. चंद्रकांत नलावडे यांची बिल्डींग, पहिला मजला, दुर्गामाता मंदिरासमोर, भानुदासनगर, जवाहर कॉलनी रोड, औरंगाबाद

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, लाम्बा निवास, पदमपाणी कॉलनी, व्दारका हॉटेलच्या पाठीमागे, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २९-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | १८-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २४-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २८-१२-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २०-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना ७७६ रुपयाचा भरणा केल्यानंतर त्यांना ३९० पानाची माहिती मिळाली आहे तथापि ती दिशाभूल करणारी आहे. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या कामकाजात बाहेरील मध्यस्थ अडथळे आणत असल्यामुळे प्रत्यक्ष पात्र लाभार्थीला फायदा होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. यामध्ये आयोगास व्यापक जनहित दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती, देय होणारी माहिती व देण्यात आलेली माहिती इत्यादीबाबत विशेष बाब म्हणून व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), औरंगाबाद यांनी व्यक्तिश: पाहणी करावी व प्रथम अपिलावर पुन्हा सुनावणी घ्यावी. याकरिता त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-११-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम नामदेव दणके, आंबेडकरनगर, गल्ली नंबर ८, एन ७, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, प्लॉट नं. २५, श्री. चंद्रकांत नलावडे यांची बिल्डींग, पहिला मजला, दुर्गामाता मंदिरासमोर, भानुदासनगर, जवाहर कॉलनी रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, लाम्बा निवास, पदमपाणी कॉलनी, व्दारका हॉटेलच्या पाठीमागे, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.प्रकाश विष्णुपंत वडवणे, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी सौ.तोडकरी बी. बी. अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १८.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी

अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि.२२.०२.२०१२ निश्चित करण्यात आली.प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी देखील सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

तहसीलदार, उस्मानाबाद यांनी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीमार्फत आयोगासमोर अहवाल सादर केला आहे. त्यावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या शिधापत्रिकेची माहिती त्यांना देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नवीन शिधापत्रिका देण्यात आली आहे. अपिलार्थी यांची याबाबतची पोच तहसीलदार, उस्मानाबाद यांच्या कार्यालयाकडे दि. १८.०२.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे. त्यामुळे त्यांचा माहिती अर्ज निकाली काढावा.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश विष्णुपंत वडगणे, सांजा रोड, शिवाजीनगर, भागिरथी निवास, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.),तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सिध्दार्थ रामराव पवार,<br>प्लॉट नं. २६ संगिता कॉलनी, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद - ४३१ ००२ | : | अपिलार्थी |
| २ | श्री. प्रशांत केशवराव म्हस्के,<br>प्लॉट नं. २६ संगिता कॉलनी, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद - ४३१ ००२ | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, खोखडपुरा, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सिध्दार्थ रामराव पवार | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी - प्रशांत केशवराव म्हस्के | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, खोखडपुरा, औरंगाबाद - श्री. मुरकुटे प्रभाकर गणपतराव | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जी. एस. सुसर, उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २६-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-१२-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०५-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी श्री. सिध्दार्थ रामराव पवार उपस्थित होते. दुसरे अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सिध्दार्थ रामराव पवार, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दुसरे अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक २९-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, खोखडपुरा, औरंगाबाद यांच्याकडे जात प्रमाणपत्र, जाती वैधता प्रमाणपत्र, बिंदु नियमावली, सेवाजेष्ठता सूचि इत्यादीबाबतची शाळेस मान्यता मिळाल्यापासून आतापर्यंतची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २६-११-२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १३-०१-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, खोखडपुरा, औरंगाबाद यांनी मुद्दा क्रमांक ०१ ते ०७ व मुद्दा क्रमांक ०९ ते १२ व मुद्दा क्रमांक ०८ बाबत प्रलंबीत माहिती दिनांक १२ फेब्रुवारी २०११ पर्यंत विनामूल्य द्यावी असा निर्णय घेतला. मुद्दा क्रमांक ८ ची माहिती अपिलार्थी यांना अप्राप्त आहे म्हणून त्यांनी व्दितीय अपील सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिनांक २८-१०-२०१० रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः दिलेली आहे अपिलार्थी यांनी याबाबत पोच दिली आहे. ही माहिती ७२ पृष्ठांची आहे व मुद्दा क्रमांक ०१ ते ०८ व मुद्दा क्रमांक १३ व १४ या मुद्दयांची माहिती दिली आहे. परंतु मुद्दा क्रमांक १ मधील बिंदु नामवली व सेवाजेष्ठतेबाबतची माहिती संस्थेकडे असल्यामुळे ती देता येऊ

शकली नाही. याकरिता संस्थेला दिनांक ०१-१०-२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १३-०१-२०११ रोजी सुनावणी घेतली व दिनांक १३ जानेवारी २०११ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस उर्वरीत माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन दिनांक १२ फेब्रुवारी २०११ पर्यंत देण्यात यावी. तथापि जन माहिती अधिकारी यांना संस्थेकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास विनंती केली की, जी माहिती मुख्याध्यापक देऊ शकले नाही ती माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन त्यांना देण्यात यावी.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये संस्थेच्या स्थापनेपासूनची म्हणजे १९६१ सालापासूनची विस्तृत अशी सुमारे ५० वर्षाच्या कालावधीची एकूण ११ मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे विस्तृत स्वरूप व मोठा कालावधी विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपिलार्थिस या माहितीची पाहणी देणे उचित ठरले असते तथापि जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती अपिलार्थीस दिनांक २८-१०-२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिलेली आहे. जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही व संस्थेकडे उपलब्ध आहे ती माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेले आहेत. तथापि त्यांना ती माहिती उपलब्ध होऊ न शकल्यामुळे ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत व्यक्तिशः माहिती मिळाली आहे त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहे. ही पोच सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना दाखविण्यात आली व अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याचे मान्य केले. त्यांची भूमिका उर्वरीत माहिती त्यांना संस्थेकडून मिळावी अशी आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली उर्वरित माहिती ही संस्थेकडील आहे व संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा लागू होत नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

............... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority.

............... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem

fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any information Officer and to entertain any such application under the Right to Information Act.

त्याचप्रमाणे संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा लागू होत नाही असे निर्णय वेळोवेळी आयोगातर्फे देण्यात आलेले आहेत. अपिलार्थी यांनी मुख्याध्यापक,शिवाजी हायस्कूल,औरंगाबाद यांच्याकडे जन माहिती अधिकारी म्हणून माहितीचा अर्ज केलेला आहे.माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनसार जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे ती देणे बंधनकारक आहे व दिल्याचे दिसून येत आहे. उर्वरीत माहितीकरिता अपिलार्थी यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडील जन माहिती अधिका-याकडे अर्ज करणे उचित ठरते. त्यांच्या कार्यालयात संस्थेच्या संदर्भात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना माहितीच्या २ (च) मधील व्याखेनुसार देय होऊ शकते. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ रामराव पवार, प्लॉट नं. २६ संगिता कॉलनी, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद - ४३१ ००२.

२. श्री. प्रशांत केशवराव म्हस्के, प्लॉट नं. २६ संगिता कॉलनी, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद - ४३१ ००२.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अ. जावेद अ. वाहेद, : अपिलार्थी
भाजी मंडई, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जी. एस. सुसर,<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ - सय्यद अहमद मोहमद अली - प्रतिनिधी<br>ॲडव्होकेट श्री. अनिल के महेर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-१२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-१२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०५-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ यांचे वकील उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी मागील सुनावणीस अनुपस्थित होते.त्यांना त्याची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि आजदेखील ते उपस्थित राहीले नाहीत.आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ यांच्या जातीच्या दुरुस्तीबाबतच्या सन १९९८ मधील प्रस्तावा-बाबतच्या संपूर्ण संचिकेची प्रत मागितली आहे. त्रयस्थ यांनी त्यांच्या दिनांक ०१-११-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने देण्यात येऊ नये, असे जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-११-०१० रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने व त्रयस्थ व्यक्तिने सम्मती न दिल्याने अपील फेटाळले आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. त्रयस्थ यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमुळे त्यांना कोणत्याही प्रकारची शासकीय नोकरी किंवा फायदा शासनाकडून मिळालेला नाही. त्यामुळे या माहितीमध्ये कुठलेही व्यापक जनहित नसल्याने त्यांची वैयक्तीक स्वरुपाची माहिती देण्यात येऊ नये. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 11 व कलम 8 (1) (j) मधील कसोटीवर उतरत नसल्यामुळे देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०२-२०१२**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अ. जावेद अ. वाहेद, भाजी मंडई, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा,<br>रा. मानवत, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, मानवत, जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मानवत,जि.परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, मानवत, जि.परभणी- श्री. यु.आर.दुधाने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत,जि.परभणी - श्री. जे.एस.सोनवणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०७.२०११ (फेरसादर दि. २१.०९.२०११) |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि. २२.०२.२०१२ अशी निश्चित करण्यात आली होती.प्रकरणात आज

पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जि.परभणी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना स.न. ५२४ या भूखंडावर केलेल्या प्लॉटींगबाबत पीटीआर दिला होता. या संदर्भात त्रयस्थांनी घेतलेल्या हरकतीमुळे चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर होती. त्यामुळे काही प्लॉटसंदर्भात पी.टी.आर. देणे बंद केले होते. आता अपिलार्थी यांना नुकतेच पी.टी.आर. दिलेले आहेत. उर्वरित पी.टी.आर.बाबत अपिलार्थी यांना जेव्हा आवश्यकता वाटेल त्यावेळी नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाकडून घेऊ शकतात.

या टप्प्यावर सदरचे प्रकरण बंद करावे अशी विनंती अपिलार्थी यांच्यातर्फे आयोगास करण्यात आली. अपिलार्थी यांची सदरची विनंती आयोगातर्फे मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा, रा. मंत्री गल्ली, मानवत, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद मानवत, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.विश्वजित रमेशराव देशमुख, : अपिलार्थी
रा. परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी, :
मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.विश्वजित रमेशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका, परभणी - श्री. बी.एस.देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - विभाग प्रमुख, बील विभाग, महानगरपालिका, परभणी - श्री. मंजूर अहसन | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी - ग्रंथपाल , महानगरपालिका, परभणी - श्री.एस. बी. दशरथे | : | उपस्थित |
| ३.५ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका, परभणी - श्री. एम. झेड दरक | : | उपस्थित |
| ३.६ | जन माहिती अधिकारी - लिपीक, महानगरपालिका, परभणी - श्री. डी. बी.गाडेकर | : | उपस्थित |
| ३.७ | जन अपिलीय अधिकारी -उपआयुक्त, महानगरपालिका, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. के. एम. जाधव, प्रशासकीय अधिकारी | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०८.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ११.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी संबंधित चार जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी उपस्थित होते. त्यावेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन आयोगापुढे निदर्शनास आलेल्या बाबींवरुन आयोगाने खालील बाबी नमूद केल्या होत्या.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१)(ख) ची एक ते सतरा मुद्यांच्या कामाच्या केलेल्या अंमलबजावणीसंदर्भात माहिती मागितली आहे. आतापर्यंत अपिलार्थी यांना ही माहिती मिळाली नाही याची गंभीर दखल आयोग घेत आहे. त्यावेळच्या तत्कालीन नगर परिषदकडे ही माहिती चार जन माहिती अधिकारी यांच्याकडे विखुरलेली आहे. ती एकत्रित करुन नगर पालिकेला अपिलार्थीस देता आली नाही.

तत्कालीन मुख्याधिकारी,नगर परिषद, परभणी व सध्याचे उप आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कलम ४(१)(ख) ची माहिती १२० दिवसांच्या विहित मुदतीत सार्वजनिक प्राधिकरणास प्रसिध्द करावयाची असताना सुध्दा आतापर्यंत करण्यात आली नाही याबाबत स्पष्टीकरण पुढील सुनावणीस सादर करण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि. २२.०२.२०१२ निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित चारही जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तयार करुन अपिलार्थीस दि. १५.०२.२०१२ रोजी संपूर्ण ८०७ पृष्ठांचा एक संच विनामूल्य देण्यात आला आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात ही बाब मान्य केली. तथापि काही माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन केले.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी लेखी स्वरुपात माहितीची मागणी केली आहे, ती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. कलम ४ (१)(ख) ची माहिती मोठया विलंबाने तयार केल्यामुळे दंड लावण्यात यावा, अशी विनंती अपिलार्थीतर्फे करण्यात आली आहे.

या सर्व बाबींवरुन सदरची माहिती तयार करण्यास उपलब्ध असलेली साधनसामग्री व मनुष्यबळ इत्यादी बाबीचा साकल्याने विचार करुन या कार्यवाहीस विलंब झाला आहे किंवा कसे ही बाब आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांना पहावी लागेल. त्याचप्रमाणे अधिनियमातील

कलम ४(१)(ख) प्रमाणे १७ मुद्यांची माहिती वेळोवेळी अद्ययावत करावयाची आहे. याची कार्यप्रणाली आयुक्तांना निश्चित करावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीन महिन्यांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजित रमेशराव देशमुख, श्री मोठा मारोती मंदिराजवळ, देशमुख गल्ली, परभणी - ४३१ ४०१

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.रावसाहेब शामराव शिंदे, : अपिलार्थी
रा. पांगरा शिंदे, ता. वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
ग्रामपंचायत कार्यालय, पांगरा शिंदे, ता.वसमत, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वसमत, जि. हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि. २२.०२.२०१२ अशी निश्चित करण्यात आली. त्यानुसार प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी देखील सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे आयोगास प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होऊ शकत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी श्रेणी-१,पंचायत समिती, वसमत, जि.हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १८.०४.२०११ रोजी निर्णय दिल्याचे दिसून येत आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांना माहिती दिलेली नसल्यामुळे यासंदर्भात ग्रामपंचायत कार्यालयात अभिलेखे आहेत किंवा कसे तसेच आरक्षित केलेल्या जागेवर बांधकाम आहे किंवा कसे याची माहिती देण्यात यावी असे नमूद केले आहे.

सुनावणीच्या वेळी आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात येऊनही आज रोजी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नसल्यामुळे सद्यपरिस्थिती अवगत होऊ शकत नाही. तरी या प्रकरणाकडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद,हिंगोली यांचे विशेष लक्ष वेधण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, त्यांना देण्यात आलेली माहिती व देय होत असलेली माहिती इत्यादीची पाहणी करावी व माहिती दिली गेली नसल्यास अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पांगरा शिंदे, ता. वसमत, जि.हिंगोली तीस दिवसांच्या आत माहिती देतील याची व्यवस्था करावी, या निकर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद,हिंगोली यांनी अपिलार्थी मागितलेली माहिती, त्यांना देण्यात आलेली माहिती व देय होत असलेली माहिती इत्यादीची पाहणी करावी व माहिती दिली गेली नसल्यास संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पांगरा शिंदे, ता. वसमत, जि.हिंगोली अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती देतील, याची व्यवस्था करावी.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत, १. श्री. रावसाहेब शामराव शिंदे, रा. पांगरा शिंदे, ता.वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पांगरा शिंदे, ता.वसमत, जि.हिंगोली

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, वसमत, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नदाफ म.बशीर खान, : अपिलार्थी
मु.पो. चोंढी (बहिरोबा),ता.वसमत,जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय,
उपविभाग वसमतनगर,जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वसमतनगर, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०६.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०९.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे

आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख दि. २२.०२.२०१२ अशी निश्चित करण्यात आली. त्याप्रमाणे प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

आज देखील सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे सद्यपरिस्थिती आयोगास समजू शकत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये वसमत उपविभागाअंतर्गत विविध विकास योजनेअंतर्गत तसेच खासदार निधी, आमदार निधी व इतर अनेक योजनाअंतर्गत केलेल्या विकास कामाची एकूण ९ मुद्यांद्वारे मागितली आहे. या माहितीचा कालावधी सन २००५-२०१० असा आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार ही माहिती देय होत आहे. तथापि माहितीचा कालावधी व व्याप्ती फार मोठी असल्याचेही दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिली आहे किंवा कसे ही बाब अवगत होऊ शकत नाही. यामुळे अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास यासाठी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात व अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग वसमत, जि.हिंगोली यांनी अपिलार्थीस आजपावेतो माहिती दिली नसल्यास वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नदाफ म.बशीर खान, मु. पो. चोंढी (बहिरोबा), ता.वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग वसमतनगर,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शफीकखाँ उमरखान पठाण,<br>रा. जुने बसस्टँड, नाका क्रमांक २, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद<br>- श्री. आर. सी. सरवदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बी. बी. राठोड, सहायक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-०७-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-०९-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १०-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. सहायक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहिती-संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक ११-०५-२०११ रोजी उपलब्ध असलेली माहिती पत्र क्रमांक जा. क्र. २०११/रामाआ/माहिती अर्ज/सीआर/४१/२७४२ अन्वये अपिलार्थीस देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शफीकखॉं उमरखान पठाण, रा. जुने बसस्टँड, नाका क्रमांक २, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विश्वजित रमेशराव देशमुख,<br>रा. परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वजित रमेशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, परभणी - श्री. प्रविण धरमकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर जिल्हाधिकारी, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी.पी.वाकोडकर, अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०७.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०९.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०९.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी उपस्थित होते.जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मौ. खानापूर, ता. जि.परभणी येथील सर्व्हे नंबर १४/१ संदर्भात सन १९८१ साली झालेल्या अकृषिक वापराच्या मंजूरी आदेशापृष्ठयर्थ दिलेल्या सहायक संचालक, नगररचना यांची सही व त्यांच्या कार्यालयाचा शिक्का असलेल्या नकाशाची प्रत मागितली आहे. मागील सुनावणीच्या वेळी आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती मिळाली नसल्याचे दिसून आले होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांना मूळ संचिकेसह व्यक्तिशः उपस्थित राहून वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख दि. २२.०२.२०१२ निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज रोजी प्रकरणात पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

आज सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी श्री. प्रविण धरमकर व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी आयोगासमोर संबंधित अकृषी मंजूरीच्या त्यांच्या कार्यालयातील सर्व संचिका अवलोकनास्तव सादर केल्या. अपिलार्थी यांनी सदर संचिकांचे आयोगासमोर अवलोकन केले. त्यामध्ये त्यांना अभिप्रेत असलेली- सहायक संचालक, नगररचना,परभणी यांची स्वाक्षरी व शिक्का असलेली नकाशाची प्रत उपलब्ध नसल्याचे दिसून आले. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांनी सर्वसाधारणपणे त्यांच्या विभागातील अकृषिक मंजूरीच्या प्रचलित पध्दतीसंदर्भात आयोगास अवगत केले की, एन.ए.परवानगी देताना संपूर्ण विभागातर्फे आदेश निर्गमित होताना त्यासोबत साधा नकाशा असतो. त्यासोबत अभिन्यास(ले-आऊट) नसतो. तथापि ले-आऊट मंजूर झाल्यानंतर सहायक संचालक, नगररचना,परभणी यांची स्वाक्षरी असलेला नकाशा संबंधित विकासकाने महसूल विभागाकडे सादर करावयाचा असतो. अपिलार्थी यांना असा सहायक संचालक, नगररचना,परभणी यांनी मंजूर केलेला नकाशा अभिप्रेत आहे. तो जन माहिती अधिकारी यांच्या नस्तीमध्ये उपलब्ध नाही. सहायक संचालक, नगररचना,परभणी यांच्या दि. २२.०८.२०११ रोजीच्या पत्रावरुन विचाराधीन सर्व्हे नंबरचा अभिन्यास (ले-आऊट) त्यांच्या कार्यालयामार्फत शिफारस करण्यात आला नसल्याचे अपिलार्थीस कळविण्यात आले असल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत सहायक संचालक, नगररचना,परभणी यांची स्वाक्षरी व शिक्का असलेली नकाशाची प्रत उपविभागीय अधिकारी,परभणी यांच्याकडे उपलब्ध असणे शक्य नाही, हे उघड होत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता सदरचे द्वितीय अपील प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

प्रसंगावशात या प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा व्यक्तिशः शोध घेऊन श्री.प्रविण धरमकर, उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केला याची नोंद आयोग घेत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजित रमेशराव देशमुख, श्री मोठा मारोतीजवळ, देशमुख गल्ली, परभणी - ४३१ १४०

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे,<br>रा.पाथरी, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा दुग्धविकास अधिकारी, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य), मुंबई | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी -श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.०५.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०९.२०११ |

यापूर्वी या प्रकरणात दि. ११.०१.२०१२ रोजी सुनावणी झाली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, त्यांनी त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जाद्वारे मागासवर्गीय मत्स्य व्यावसायिक सहकारी संस्था मर्या.,पाथरी, जि.परभणी संदर्भात एकूण

१४ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००० ते २०११ असा आहे. त्यांना आजपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेली नाही. त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (मत्स्य),म.रा. मुंबई यांनी सुनावणी घेऊन दि.०५.१२.२०११ रोजी निर्णय दिला आहे. या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिले आहेत की, " ---- अर्जदार यांना आवश्यक असलेली माहिती संस्थेकडुन प्राप्त करुन द्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. अर्जदार यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी गैर अर्जदार यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून हवी असलेली संपूर्ण माहिती प्राप्त करुन घेऊन तसे या कार्यालयास कळवावे." तथापि त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही.

तथापि यासंदर्भात आयोगासमोर बाजू मांडण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांची बाजू आयोगास समजू शकत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. या बाबीची गंभीर दखल घेऊन आयोगातर्फे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्याकरिता पुढील सुनावणीची तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे प्रकरणात पुढील तारीख दि. २२.०२.२०१२ अशी निश्चित करण्यात आली होती. त्याप्रमाणे आज सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी देखील जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोगातर्फे गंभीर दखल घेण्यात येत आहे. अपिलार्थी यांना आजपावेतो माहिती मिळालेली नाही, असे दिसून येत आहे. आयोगाच्या कार्यालयाकडून उपनिबंधक, सहकारी संस्था (मत्स्य), आयुक्त, मत्स्य व्यवसाय यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सुनावणीकरिता दि. ०२.०२.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले होते. तरीही ते आज रोजी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता व त्यांना माहिती दिली नाही ही बाब विचारात घेता, प्रकरण चौकशीयोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची शिफारस आयुक्त, मत्स्य व्यवसाय विकास विभाग, मुंबई यांना कलम २०(२) अन्वये करण्यात येत आहे. प्रकरणात चौकशी करुन दोषी आढळल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य प्राप्त होईल, असे पहावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

आयुक्त, मत्स्य व्यवसाय,महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रकरणात चौकशी करुन दोषी आढळल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करावी. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, जिल्हा परभणी यांच्यामार्फत अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे

विनामूल्य प्राप्त होईल, असे पहावे. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे, इंदिरानगर, पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्धविकास अधिकारी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य),आयुक्त मत्स्य व्यवसाय यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र शासन, तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एम.एस.बोधने, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मदाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी- श्री.पांडुरंग रामराव चव्हाण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक धर्मदाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी- श्री. के. व्ही. मसने | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.१०.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ११.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे तसेच जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांची अधिनियमातील कलम १८ (३) (ङ) नुसार विशेष साक्ष आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठीची पुढील तारीख दि. २२.०२.२०१२ अशी निश्चित करण्यात आली. त्यानुसार आज प्रकरणात पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी देखील सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगासमोर कथन करण्यात आले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. २१.०२.२०१२ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील प्रकरणात चौकशी प्रक्रिया /कार्यवाही प्रगतीप्रथावर असल्यामुळे त्यावेळी माहिती देण्यात आली नव्हती. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची सद्यपरिस्थिती/माहिती/कागदपत्रे अपिलार्थीस देण्यात आलेली आहेत. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः स्वीकारली आहेत. अपिलार्थी यांनी पोचही दिलेली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती, ती दिली असल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एम.एस.बोधने,प्रतापनगर,नांदखेडा रोड,परभणी

२.	जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एन.एस.भराटे, : अपिलार्थी
रा.मानवत, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे-१
जन अपिलीय अधिकारी तथा :
संचालक,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. एन.एस.भराटे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.०४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.०५.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.०७.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.१२.२००८ (पुणे कार्यालयाकडे प्राप्त)<br>दि. २०.०१.२०११ (औ.बाद कार्यालयाकडे फेरसादर) |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १७.०६.२०११ व २५.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. दि. १७.०६.२०११ रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नसल्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेण्याकरिता आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यानंतर दि. २५.०१.२०१२ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित होते. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची पुन्हा एक संधी देण्याकरिता आयोगाने सुनावणीची पुढील तारीख दि. २३.०२.२०१२ अशी निश्चित केली. त्यानुसार प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी आजही अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे. त्यांनी आपल्या या अनुपस्थितीबाबतचा खुलासा त्यांच्या विभागप्रमुखांमार्फत आयोगास सादर करावा.

अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन त्यांना काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मिळाली आहे. तथापि ती अपूर्ण आहे. त्यांना खालील माहिती अभिप्रेत आहे.

१) अपिलार्थी यांनी त्यांच्या सेवानिवृत्तीसंदर्भात लोकायुक्त यांच्याकडे दि. ०७.०३.२००६ रोजी अर्ज सादर केला होता. त्यातील परिच्छेद क्र. २ व ५ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतच्या माहितीच्या प्रती.

२) दि. २१.०६.२००६ व ०५.०२.२००७- संचालक कार्यालयाचे दि. २१.०६.२००६ व ०५.०२.२००७ या द्वारे दिलेली माहिती विसंगत आहे. यामुळे अंतिमरित्या केलेल्या कार्यवाहीच्या प्रती व त्यासंदर्भातील पत्रव्यवहार तसेच टिपणीच्या प्रती.

३) संचालकांकडे सादर केलेल्या मुद्दा क्र. २ बाबतच्या टिपणीमध्ये विसंगती आहे. त्यावर घेतलेल्या अंतिम निर्णयाची प्रत.

ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. अपिलार्थी ज्येष्ठ नागरिक आहेत. या माहितीशी संबंधित अभिलेखांची पाहणी केल्यास त्यासंदर्भातील कागदपत्रे अपिलार्थीस प्राप्त होऊ शकतील. जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी, या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. एन. एस.भराटे, 'शिवम्', रचना कॉलनी, मानवत, जि.परभणी - ४३१ ५०५.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विलास विष्णुदास मोरे,<br>मु. पो. गुगळी धामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विलास विष्णुदास मोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०४-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १६-०६-२०११ व २५-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. दोन्ही वेळेस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्याकरिता दोन वेळेस सुनावणी पुढे ढकण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक ०२-१२-२००९ च्या माहितीच्या अर्जान्वये पूर्णा तहसील कार्यालयाची एकूण १२ मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांनी विहित मुदतीत दिलेली नाही. अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे दिनांक १६-०१-२०१० रोजी सादर केले त्यावर दिनांक १५ फेब्रुवारी २०१० रोजी निर्णय घेण्यात आला की, अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात यावी. परंतु अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती मिळालेली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ जानेवारी २००८ ते माहिती अर्ज सादर करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीची विविध मुद्यावर तहसील कार्यालय, पूर्णा यांच्याकडे पूर्णा तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानाबाबतची तसेच तहसीलदाराच्या दैनंदिनीच्या प्रती, तहसील कार्यालयाकडे किती शासकीय वाहने होती, वाहनासाठी महिनानिहाय किती खर्च आला, गाडीच्या लॉगबुकच्या प्रती, पुरवठा विभागासाठी वाहनावर केलेला खर्च त्याचप्रमाणे कलम ४ मधील १७ कामांची फार मोठ्या प्रमाणावर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे.ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल कशी होतात असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी देण्याची संधी देणे आवश्यक होते.तथापि त्यांनी ही बाब केलेली दिसून येत नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व

पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकीत प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी मागील सुनावणीस अनुपस्थित होते आणि आजही अनुपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलावरील निर्णयानंतरही अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यात आलेली नाही. या बाबींचा विचार करता सदरचे प्रकरण गांभीर्यपूर्वक हाताळले गेले नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अतः अपिलार्थीस पाहणीनतंर सदरची माहिती विनामूल्य देण्यात यावी आणि या माहितीकरिता येणारा खर्च संबंधित तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून वसूल करुन घेण्यात यावा. तसेच या प्रकरणामध्ये राज्य माहिती आयोगाकडील सुनावणीस उपस्थित न राहणे, माहिती देण्यास विलंब करणे इत्यादीबाबतची जिल्हाधिकारी, परभणी यांनी चौकशी करुन या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक / अधिकारी यांची विभागीय चौकशी करावी, अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार आयोगातर्फे त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी व वर निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्काची रक्कम संबंधितांकडून वसूल करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. जिल्हाधिकारी, परभणी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक कर्मचारी / अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब करणे व आयोगापुढील सुनावणीस उपस्थित न राहणे याबाबत विभागीय चौकशी करावी अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार आयोगातर्फे त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०२-२०१२**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास विष्णुदास मोरे, मु. पो. गुगळी धामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वामन रंगनाथराव मोरे, | : | अपिलार्थी |
| रा.परभणी | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वामन रंगनाथराव मोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०९.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २२.०६.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानुसार पुन्हा दि.

२५.०१.२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांपैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे प्रकरणात पुढील तारीख दि. २३.०२.२०१२ निश्चित करण्यात आली. त्यानुसार आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे परभणी ज्ञानोपासक नागरी सहकारी बँक, परभणी तालुका जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्था व पिपल्स सहकारी नागरी बँकेसंदर्भात माहिती मागितली आहे. तथापि त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपील फेटाळले आहे. याविरुध्द अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे व त्यांना माहिती मिळावी अशी त्यांची विनंती आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित आहे. काही मुद्दे प्रश्नार्थक, खुलासेवजा आहेत. अधिनियमातील कलम २(च) च्या व्याख्येत ही बाब येत नसल्यामुळे अशी माहिती देय होत नाही. तसेच काही मुद्दे त्रयस्थांच्या त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेबाबत, कर्ज, तारणाबाबतची वैयक्तिक माहिती आहे. अशी माहिती अधिनियमातील कलम 8(1)(j) तरतुदीनुसार जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे देय होणार नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी, रा.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,पुणे-१
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहकार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, सहकार संस्था,पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५.०६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५.०७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.११.२००७ (पुणे खंडपीठाकडे प्राप्त) ०६.०४.२०१० (औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त) |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०८.०७.२०११ व २५.०१.२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. या दोनही सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि.२३.०२.२०१२ अशी निश्चित

करण्यात आली.त्यानुसार प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी आज देखील अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही, असे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेतलेला नाही. माहिती अधिकार अधिनियम राबविण्यामध्ये कसूर होत आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. यास्तव प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त,महाराष्ट्र राज्य, सहकार संस्था,पुणे-१ यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दिली जाईल यासाठी कार्यवाही करावी. तसेच या प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास यथोचित कारवाई करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी अपिलार्थी यांच्या दि. ०५.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी, श्रीकृष्णनगर,सम्राट चौक,लातूर - ४१३ ५१२

२. जन माहिती अधिकारी, सहकार आयुक्त, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नानासाहेब हनुमंत कांबळे,रा.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
सहायक निबंधक (प्रशासन),
सहकारी संस्था,लातूर : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१००६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक, संलग्न जिल्हा उपनिबंधक, सह.संस्था, लातूर - श्री. एन.एस.किलचे | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. एम.जी.गुंजकर, सहायक निबंधक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी- सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था,लातूर - सौ. स्मृती एन.पाटील | : | उपस्थित |
| ३.४ | विशेष साक्ष -विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर- श्री. एस.ए.वाडेकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २१.०७.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर दि.२५.०१.२०१२ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.जन माहिती अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीच्या वेळी आयोगातर्फे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांची विशेष साक्ष नोंदविणे आवश्यक वाटल्यामुळे दि. २३.०२.२०१२ रोजी निश्चित केलेल्या सुनावणीस वस्तुनिष्ठ माहितीसह उपस्थित राहण्याचे सूचित करण्यात आले. त्यानुसार आज दि. २३.०२.२०१२ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तसेच विशेष साक्षीसाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर उपस्थित आहेत.

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,लातूर यांनी आयोगासमोर मजूर सहकारी संस्थेअंतर्गत कामाच्या वाटपासंदर्भात त्यांच्या विभागातील प्रचलित कार्यपध्दतीबाबत कथन केले की, लातूर जिल्हयामध्ये मजूर सहकारी संस्थेअंतर्गत समितीमार्फत कामाचे वाटप करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था हे या समितीचे सचिव असून सदरचे कामकाज समितीमार्फत होते. फेडरेशनमार्फत दैनंदिन कामकाज व निर्णय घेण्यात येतात. त्यामुळे अपिलार्थी यांचा माहिती अर्ज फेडरेशनकडे पाठविला होता.अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे प्रथम अपील सादर केले त्यावर सुनावणी घेऊन दि. २६.०३.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी उपनिबंधक कार्यालयाकडे माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे अपिलार्थीने दारिद्ररेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर केल्यास अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात यावी. तथापि असा पुरावा अपिलार्थी यांनी सादर केला नसल्यामुळे त्यांना माहिती देण्यात आलेली नाही.

अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित आहेत. त्यांना आयोगापुढे बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. तथापि ते अनुपस्थित राहिले आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी एकूण २१ मुद्यांवर विस्तृत स्वरुपात मजूर सहकारी संस्थेसंदर्भात माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि.०२.०४.२००७ ते १५.०१.२०१० असा सुमारे तीन वर्षांचा आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व कालावधी पाहता, अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.अतः अपिलार्थी यांनी नेमकी १-२ मजूर संस्थेविषयी माहिती पंधरा दिवसांच्या आत मागावी व तदनंतर

त्याविषयी कागदपत्रे अपिलार्थीस विनामूल्य देण्यात यावीत, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने माहितीची व्याप्ती कमी करुन नेमकी १-२ संस्थांसंदर्भात त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती देण्याची कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नानासाहेब हणुमंत कांबळे,द्वारा श्री. गणेश दगडू होळे, रा.सूळ गल्ली,खडक हनुमान मंदिर,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,संलग्न जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन),सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रदिप गोविंदराव कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,सिल्लोड, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,सिल्लोड,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रदिप गोविंदराव कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, सजा,पानवडोद खु.,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद - श्री. एल.एस.कुलट | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, भोकरदन,जि.जालना - श्री. जी. डी. हिवाळे | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, सिल्लोड, जि. औरंगाबाद - श्री. अरुण जोशी | : | उपस्थित |
| ३.५ | तहसीलदार, भोकरदन, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ३.६ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.७ | उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.८ | उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री. व्ही. यु.करमनकर, अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०९.२०१० |

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. १६.११.२०११, १७.१२.२०११ व १७.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती.

प्रकरणात वरील सर्व सुनावणीच्या वेळी आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या मौ. पानवडोद खु., ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद येथील सर्वे नं. १४३, १५४, १५९ आताचे गट नं. ३२९, ३४० व ३४१ चा फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झाला, त्या कागदपत्रांच्या प्रतीसह संबंधित माहिती मागितली असल्याचे व त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली नसल्याचे दिसून येत आहे.

प्रकरणात अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने आयोगातर्फे सध्याचे जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा पानवडोद खु.,तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.जी.जरारे, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड,जि.औरंगाबाद, उपविभागीय अधिकारी, सिल्लोड जि. औरंगाबाद यांना वस्तुनिष्ठ माहितीसह उपस्थित राहण्याच्या सूचना जिल्हाधिकारी औरंगाबादमार्फत देण्यात आल्या होत्या.

मागील दि. १७.०१.२०१२ रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, भोकरदन, जि.जालना यांनी आयोगासमोर कथन केले होते की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या संचिकांचा त्यांच्या कार्यालयात शोध घेण्यात येईल.प्रकरणात तहसील कार्यालय, भोकरदन येथे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखांचा शोध घेऊन वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची तारीख दिनांक २३.०२.२०१२ निश्चित करण्यात आली होती व सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित सर्व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तीशः उपस्थित राहण्याचे सूचित करण्यात आले होते.

तथापि आज दि. २३.०२.२०१२ रोजी सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी, सिल्लोड श्री. प्रकाश खपले व तहसीलदार, सिल्लोड, जि. औरंगाबाद श्री. सुर्यवंशी उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही. या प्रकरणी राज्य माहिती आयोगाने आजच्या सुनावणीसह एकूण चार वेळा सुनावणी घेतली आहे. तरीही अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही व वेळोवेळी घेतलेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याचे दिसून आले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी संपूर्ण प्रकरणात चौकशी करणे आवश्यक ठरत आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. ही माहिती सिल्लोड, जि.औरंगाबाद व भोकरदन, जि.जालना कार्यालयाशी संबंधित आहे. विभागीय आयुक्त, औरंगाबाद

विभाग,औरंगाबाद यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) व 19(7) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती नेमकी कोणत्या कार्यालयात उपलब्ध आहे, याचा शोध घेण्याकरिता त्यांच्या कार्यालयातील जबाबदार अधिकाऱ्याची जसे अपर आयुक्त किंवा उपआयुक्त यांची नियुक्ती करावी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली माहितीचा शोध घेऊन अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत पाठविण्याची व्यवस्था करावी. माहितीचा शोध घेऊनही ती उपलब्ध होत नसल्यास तसे अपिलार्थीस कळवून ही माहिती जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर होती, त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करावी, अशी अधिनियमातील कलम २०(२) अनुसार शिफारस करण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

विभागीय आयुक्त,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप गोविंदराव कुलकर्णी,प्लॉट नं. जे ४९, सिडको, एन-५, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा,पानवडोद खु.,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तांबोळी इस्माईल बाशासाहेब,<br>नवीन बालाजी नगर, अजगरसाब प्लॉट, उमरगा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय समाजकल्याण अधिकारी, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औसा रोड, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय समाजकल्याण अधिकारी, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. आर. के. वंगाटे, व. लि. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औसा रोड, लातूर | : | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २०-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २५-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-११-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाल्याचे दिसून येत आहे व अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १३-१२-२०१० रोजीच्या पत्रान्वये त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाल्याने त्यांचे दिनांक २५-११-२०१० रोजीचे व्दितीय अपील दप्तर दाखल करण्याची विनंती केली आहे. यास्तव प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तांबोळी इस्माईल बाशासाहेब, नवीन बालाजी नगर, अजगरसाब प्लॉट, उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय समाजकल्याण अधिकारी, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औसा रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माने सतिश भाऊराव, : अपिलार्थी
रा.मदनसुरी, ता.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक (प्रशासकीय),
अधीक्षक अभियंता कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक (प्रशासकीय), अधीक्षक अभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर - श्री. सी. पी. हिरेमठ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर - श्री. एस.ए.पोरेडी | : | उपस्थित |
| ३.४ | विशेष साक्ष - अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर - श्री. एम.एम.सुरकुटवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०५.२०११ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.०६.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०८.२०११ (पुणे खंडपीठास प्राप्त) |
| | | दि. २५.०८.२०११ (औ.बाद खंडपीठास प्राप्त) |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १७.११.२०११,१७.१२.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांनी विशेष साक्षीसाठी व्यक्तिशः उपस्थित राहण्याच्या सूचना देऊन सुनावणीची पुढील तारीख दि. १७.०१.२०१२ अशी निश्चित करण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तथापि अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,सोलापूर विशेष साक्षीसाठी उपस्थित न राहिल्यामुळे आयोगातर्फे पुढील सुनावणीची तारीख दि.२३.०२.२०१२ निश्चित करण्यात आली. प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच. विशेष साक्षीसाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,सोलापूर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, मागील सुनावणीच्या वेळी निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस दि. १८.०१.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविण्यात आलेली आहे. यासंदर्भातील अपिलार्थी यांची पोच जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे. त्यापूर्वी दि. ०४.०७.२०११ रोजी काही माहिती पाठविण्यात आली आहे त्यावेळी स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना नोकरी देण्यासंदर्भातील शासन निर्णयाच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत. अधीक्षक अभियंता यांनी कथन केले की,त्यांच्या विभागातर्फे जाहिरात देऊन स्पर्धा परीक्षा घेऊन स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांना नोकरी देण्यात आलेली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन आता अपिलार्थीस माहिती मिळाली असल्याचे दिसून येत आहे.

प्रसंगावशात, कर्मचारी भरती करण्याकरिता सर्व शासन निर्णयाचे स्थायी आदेश संचिका त्यांच्या विभागीय कार्यालयामध्ये अद्ययावत ठेवण्यात येतील व स्वातंत्र्यसैनिक, अनुकंपा, प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या ज्येष्ठता याद्या इ. माहितीचे वेळोवेळी अद्ययावतीकरण होईल, या बाबीकडे अधीक्षक अभियंता यांनी पाहणे आवश्यक आहे, अशा आयोगातर्फे सूचना देण्यात येत

आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.माने सतिश भाऊराव, मु.पो.मदनसूरी, ता.निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (प्रशासकीय), अधीक्षक अभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी,<br>विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०४-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १२-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि ते आजही उपस्थित राहीले नाहीत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार दिनांक ०७-०१-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांनी शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देण्यात येईल, असे कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी दिनांक २८-०१-२०११ रोजी शुल्काचा भरणा केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती नेणार होते त्यामुळे त्यांनी कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेणे आवश्यक आहे. यापूर्वी अपिलार्थी यांना माहिती मिळाली नसल्यास त्यांनी ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत,

जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती लक्ष्मीबाई भ्र. नागनाथ रामपुरे, : अपिलार्थी
रा.शिवरामनगर,जि.परभणी

**विरुध्द**

जन अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, धर्माबाद, जि.नांदेड

:

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत शेळगाव (थडी), ता.धर्माबाद, जि.नांदेड- श्री. अनुप जागेश्वर श्रीवास्तव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद, जि.नांदेड - श्री. रहाटीकर यु.डी. | : | उपस्थित |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०८.२०११ |
| ५ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २५.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे खालील अंतरिम आदेश आयोगातर्फे देण्यात आले होते.

"१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,धर्माबाद, जि.नांदेड यांच्या या प्रकरणाशी संबंधित दि. ०८.०८.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावरील निर्णयास स्थगिती देण्यात येत आहे.

२) या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २३.०२.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे."

त्यानुसार आज सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, मूळ अर्जदार श्री. मोहनराव इरवंतराव गुलांडे यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे, सावित्राबाई मोहन यांच्या नावावरुन (त्यांच्या पत्नीच्या)सावित्राबाई नागनाथ रामपुरे असा जो नावात बदल करण्यात आलेला आहे. तो बदल ज्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आला, त्या संदर्भातील कागदपत्रे व रजिस्टरमधील नकला तसेच नमूना नं. ८ ची प्रत - या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या आहेत. आयोगासमोर युक्तिवादात कथन करण्यात आले की, संदर्भित प्लॉट मूळ अर्जदार यांच्या पत्नी - सावित्राबाई मोहन यांच्या नावावर होता. तो त्यांच्या नावावरुन सावित्राबाई नागनाथ रामपुरे असा झाला असून त्यांच्या नावात बदल करुन सावित्राबाई यांच्या नावासमोर त्यांच्या वडिलांचे नाव लावण्यात आले आहे. म्हणजेच, अर्जदार यांच्या सासऱ्याच्या नावावर झाला आहे. हा फेरफार ज्या कागदपत्रांच्या आधारे झाला त्यासंदर्भातील कागदपत्रांच्या प्रती मागितल्या आहेत. यासंदर्भात कोणताही पुरावा ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नाही, असे दि. ०४.०६.२०११ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,धर्माबाद, जि.नांदेड यांच्याकडे प्रथम अपील सादर केले, त्यावेळी मूळ अर्जदार उपस्थित होते. त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी खालील निर्णय दिला आहे.

" १) अपील अंशत: मान्य करण्यात येते.

२) माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा.पं. शेळगांव(थडी) ता.धर्माबाद जि.नांदेड यांनी सावित्रीबाई मोहन (पती) या नावांने आसलेला रिकामा प्लाटचे फेरफार श्रीमती सावित्राबाई नागनाथ (वडील) हे कशा आधारे घेतला यांची माहिती देवु शकले नाहीत.

३) सदरील प्रकरणात झालेला फेर नियमबाहय केलेला असेल तर पुढील ग्रा.पं.बैठकित तो रद्द करुन परत श्रीमती सावित्राबाई मोहन या नावाने करण्याचे आदेश देण्यात येत आहेत व सदरील प्रकरण निकाली काढण्यात यावे.

४) सदर निर्णयाविरुध्द द्वितीय अपील करावयाचे असल्यास त्यांनी ९० दिवसाच्या आत मा.राज्य माहिती आयोगाकडे आपले द्वितीय अपील दाखल करावे."

(टीप : जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील निर्णयातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

या निर्णयाविरुध्द वरील त्रयस्थ पक्ष- श्रीमती लक्ष्मीबाई भ्र.नागनाथ रामपुरे - मयत मुलीच्या आई यांनी द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. त्या अनुपस्थित आहेत. त्यांनी अपिलाच्या कारणांमध्ये

प्रथम अपिलावर निर्णय देताना त्रयस्थांचे म्हणणे ऐकून घेतले नाही व चुकीचे प्रशासकीय आदेश दिले, असे नमूद केले आहे. आज रोजी त्या व त्यांचे वकील अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी मूळ अर्जदाराच्या प्रथम अपिलावर घेतलेला निर्णय क्र. १,२ व ४ यामध्ये बदल करण्याची आवश्यक वाटत नाही. मुद्दा क्र.३ हा प्रशासकीय स्वरुपाचा आदेश असल्याने व माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत झालेल्या प्रथम अपिलावर अशा स्वरुपाचे प्रशासकीय आदेश देणे अपेक्षित नाही. त्यामुळे मुद्दा क्र.३ मधील जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय रद्द करण्यात येत आहे. तथापि यामुळे संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या न्यायसंगत-यथोचित प्रचलीत विभागाच्या कार्यप्रणालीनुसार प्रशासकीय कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यास काहीही बाधा येणार नाही, असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती लक्ष्मीबाई भ्र. नागनाथराव रामपुरे,रा. शिवरामनगर,वसमत रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शेळगाव(थडी), ता.धर्माबाद, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल,<br>रा. दबीरपुरा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, औसा रोड, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, औसा रोड, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, औसा रोड, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. वंगाटे आर. के., व. लि. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, औसा रोड, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०१-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०७-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-०८-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०९-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १७-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांना दिनांक २२-०३-२०११ च्या पत्रान्वये माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि ते आजही अनुपस्थित आहेत. आयोगाच्या निदर्शनास असेही आले आहे की, अपिलार्थी यांची बरीच व्दितीय अपील प्रकरणे सुनावणीस येतात, परंतु ते सुनावणीस उपस्थित राहत नाहीत. याची दखल आयोग घेत आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, औसा रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, औसा रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपिलार्थी
ॲड गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३०६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजयभाऊ जयराम कांबळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. खंदारे भारत बळीराम | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर<br>- श्री. राजेंद्र शिवाजीराव कदम | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-०४-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०७-२०११ फेरसादर दिनांक १६-०९-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १३-०१-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक १९-०१-२०११ च्या माहिती अर्जान्वये एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली होती. माहितीचा कालावधी सन २००६ ते २०१० असा होता. जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला नाही म्हणून दिनांक २५-०२-२०११ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २६-०४-२०११ रोजी निर्णय दिला आहे त्यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे माहितीसाठीचे शुल्क भरण्याचे पत्र न मिळाल्याने त्यांना परत या पत्राची प्रत द्यावी व अपिलार्थीने माहितीचे शुल्क भरल्यानंतर पाच दिवसात माहिती द्यावी. अपिलार्थी यांना अद्यापपावेतो ही माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-०१-२०११ चा अर्ज दाखल केला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मंडळ कृषि अधिकारी कार्यालय, किनगांव यांच्याकडील असल्याने सदर माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला त्यानंतर अपिलार्थीस दिनांक १४-०२-२०११ रोजी पैसे भरण्याकरिता अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टव्दारे कळविण्यात आले. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी यांना सदरचे पत्र प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांनी प्रथम सुनावणीच्या वेळी निदर्शनास आणून दिल्यावर त्यांना सदर पत्राची प्रत देण्यात आली. तथापि अपिलार्थी यांनी माहितीसाठी लागणा-या रुपये १५९२ इतक्या शुल्काचा भरणा न केल्याने त्यांना माहिती पाठविता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीचा दिनांक २५-०२-२०११ चा अपील अर्ज त्यांना दिनांक २८-०२-२०११ ला प्राप्त झाला. दिनांक २८-०३-२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जी माहिती मागितली आहे त्याकरिता रुपये १५९२ इतके शुल्क भरणे आवश्यक आहे म्हणून त्याचा भरणा करावा असे विहित मुदतीत कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना ते पत्र मिळाले नाही असे त्यांनी सांगितले. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. माहिती अधिकार अधिनियम तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर यासंदर्भातील पुढील घडमोडी, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क, माहितीचा तपशील इत्यादी प्राप्त करुन घेणे हे अर्जदाराचे संपूर्ण उत्तरदायित्व असते मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असणा-या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची राहत नाही एवढे असूनही या प्रकरणी अपिलार्थीने अर्ज केल्यापासून त्यांनी तीस दिवसाच्या आत अपिलार्थीच्या अर्जावर प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. विनामूल्य माहितीची सुविधा दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना असते आणि अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील नाहीत त्यामुळे अपिलार्थी यांनी विनामूल्य माहितीची अपेक्षा करु नये. अपिलार्थी यांची बरीच व्दितीय अपिले प्रकरणे राज्य माहिती आयोगापुढे आहेत व त्यापैकी ब-याच प्रकरणात त्यांना पत्रे मिळाली नाहीत असे सुनावणीच्या वेळी त्यांनी आयोगास कथन केले आहे. यावर त्यानी पोस्टाकडे तक्रार करणे उचित ठरेल असे आयोगाचे मत आहे. अतः अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा एका महिन्याच्या आत करावा व माहिती हस्तगत करुन घ्यावी. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे शुल्काचा भरणा केल्यास नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, ॲड गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी,

नांदेड रोड, लातूर, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनिल केशवराव कान्हे, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली.
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,
हिंगोली.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३५३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनिल केशवराव कान्हे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १४.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०८.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १८.११.२०११ व १७.१२.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि. २३.०२.२०१२ अशी निश्चित करण्यात आली. त्यानुसार प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन

माहिती व अपिलीय अधिकारी  अनुपस्थित आहेत. कायदा व सुव्यवस्थेच्या कामामुळे उपस्थित राहू शकत नाही सुनावणीसाठी पुढील तारीख द्यावी, अशी विनंती केली आहे. यापूर्वी दोन वेळा सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांची विनंती मान्य करता येत नाही.

अपिलार्थी यांचा युक्तिवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १९.०४.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक, वसमत, जि.हिंगोली यांच्याकडून दि. २४.१२.२०१० व १८.०१.२०१० रोजी प्रत्यक्ष भेटून सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन हट्टा येथे गुन्हे नोंदविण्याबाबतच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची माहिती मागितली आहे. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो दिलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यात यावी, असे सूचित केले आहे. तथापि अपिलार्थीस माहिती मिळालेली नव्हती. त्यांना उशिरा दि. १३.०२.२०१२ रोजी माहिती मिळाली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी अपिलार्थी यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस विलंबाने माहिती मिळाली आहे ही बाब दिसून येत आहे. ज्या वेळी माहितीचा अर्ज मिळाला त्यावेळी सदरील अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या सद्यपरिस्थितीची माहिती देणे योग्य ठरत होते. तशी कार्यवाही केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. याकरिता पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी या प्रकरणी संपूर्ण चौकशी करावी. माहिती देण्याकरिता विलंब झाला असल्यास संबंधित अधिकारी व कर्मचारी माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत दोषी आढळल्यास यथोचित कारवाई योजावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. अनिल केशवराव कान्हे, द्वारा कान्हे पाटील हॉस्पीटल, शिवाजी पुतळयाजवळ, डॉ. हेडगेवार मार्ग,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तिवारी विद्याधर प्रसाद रामप्रसाद, : अपिलार्थी
घर नं. ३-२-१९४, शिवाजी हौसिंग सोसायटी, बसस्टँड समोर, उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण उपसंचालक, गांधी चौक, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३७९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तिवारी विद्याधर प्रसाद रामप्रसाद | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४-०८-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०८-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०९-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १३-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित

होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

दिनांक १३-०१-२०१२ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले होते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यातील एका मुद्दयाची माहिती त्यांना मिळाली आहे.

खालील दोन मुद्दयाची माहिती मिळालेली नाही.

१. विचाराधीन दिनांक ०९-०४-२०१० च्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी पाठपुरावा केलेल्या अहवालाच्या प्रती.

२. वरील निर्णयावर संस्थेने केलेल्या अंमलबजावणीबाबतच्या प्रती.

ही माहिती अपिलार्थीस एका महिन्याच्या आत देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर सांगितले होते.

अपिलार्थी हे जेष्ठ नागरिक आहेत. त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे. याकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना परत एकदा त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी सुनावणीस पुढील तारीख देण्यात आली होती.

आज रोजी पुन्हा जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.मागील सुनावणीच्या वेळी नमूद केलेल्या दोन मुद्यांच्या माहितीसंदर्भातील नस्ती व मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा संच घेऊन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगासमोर उपस्थित राहावे लागेल याकरिता प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०४-०४-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तिवारी विद्याधर प्रसाद रामप्रसाद, घर नं. ३-२-१९४, शिवाजी हौसिंग सोसायटी, बसस्टँड समोर, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, गांधी चौक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नागनाथ राचय्या स्वामी,<br>२-६३, पार्वती मॅन्शन कोळे गल्ली, निलंगा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अवर सचिव (सेवा-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव (सेवा-९), वित्त विभाग, तिसरा मजला,<br>मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नागनाथ राचय्या स्वामी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अवर सचिव (सेवा-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२<br>- श्री. य. द. देशकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव (सेवा-९), वित्त विभाग, तिसरा मजला,<br>मंत्रालय, मुंबई - ३२ श्री. शि. म. म्हात्रे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०३-२०११ मुंबई कार्यालयाकडे प्राप्त<br>२६-०९-२०११ औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १७-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, आज रोजी आयोगासमोर विचाराधीन असलेला माहिती अर्ज त्यांच्या विभागाशी संबंधित नसून तो अपिलार्थीने आरोग्य विभागाकडे केलेला आहे परंतु अपिलार्थीने प्रथम अपील आरोग्य विभागाकडे न करता वित्त विभागाकडे केले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २०-१०-२०१० चा माहितीचा अर्ज केला आहे व या अर्जासोबत दिनांक २६-१०-२०१० चे पुरवणी प्रश्न जोडले आहेत. असे पुरवणी प्रश्न माहिती अधिकार अधिनियमामध्ये बसत नाही. अपिलार्थी यांना केवळ त्यांच्या दिनांक २०-१०-२०१० च्या माहिती अर्जातील मुद्दयांकरिताच माहिती मिळू शकते. अपिलार्थी यांनी सांगितले की, त्यांना माहिती मिळाली नाही. अपिलार्थी यांनी तीन मुद्दयांवर माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्रमांक एक व तीन हे प्रश्नार्थक स्वरुपाचे आहेत व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये दिलेल्या माहितीच्या व्याख्येनुसार अशी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मुद्दा क्रमांक दोनमधील कायमचा पत्ता वगळून दोन त्रयस्थाबाबतची इतर माहिती अपिलार्थीस देय होते. मुद्दा क्रमांक दोनची माहिती त्यांना प्राप्त झाली आहे तथापि ती उशिराने प्राप्त झाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थी यांनी केलेला माहितीचा अर्ज, माहितीच्या अर्जावरील प्रथम अपील इत्यादी सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी माहिती अर्ज आरोग्य विभागाडे व प्रथम अपील वित्त विभागाकडे केल्याने त्यांना माहिती प्राप्त होण्यास विलंब झाला आहे, असे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागनाथ राचय्या स्वामी, २-६३, पार्वती मॅन्शन कोळे गल्ली, निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (सेवा-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (सेवा-९), वित्त विभाग, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सफीयोद्दीन वलियोद्दीन काझी, : अपिलार्थी
रा.गंगाखेड, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
भांडारपाल, नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सफीयोद्दीन वलियोद्दीन काझी | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड पी.एल.टिकले | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी -भांडारपाल, नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे वकील ॲड. ए.व्ही.राख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१०.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १२.०१.२०१२ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी त्यांच्या

वकिलासह उपस्थित होते. अपिलार्थी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि.२३.०२.२०१२ अशी निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व त्यांचे वकील, जन अपिलीय अधिकारी यांचे वकील उपस्थित आहेत.

आयोगासमोर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांच्या वकिलांनी त्यांचा युक्तिवाद सादर केला. आयोगास सादर करण्यात आलेले कागदपत्र व युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, यापूर्वी आयोगापुढे या प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी दिलेल्या निर्णयाद्वारे आयोगातर्फे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड, जि.परभणी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, असे सूचित करण्यात आले होते. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाल्याचे दिसून येत नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या वकिलांनी सांगितले की, अपिलार्थी यांना नोटीस देऊनही ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत व अपिलार्थी यांच्या वकिलांनी सांगितले की, त्यांना सुनावणीची नोटीस मिळालेली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक आहे. याकरिता आयोगातर्फे दि. २८.०३.२०१२ ही तारीख निश्चित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड, जि.परभणी यांनी अपिलार्थी व त्यांचे वकील यांच्या उपस्थितीत सुनावणी घ्यावी. या सुनावणीचे वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन, त्यासंदर्भातील इतिवृत्त नोंदवून मुद्देनिहाय अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित निर्णय घ्यावा. अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत तरीही त्याप्रमाणे नोंद घेऊन वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा, या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०३.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर वर नमूद केल्याप्रमाणे दि. २८.०३.२०१२ रोजी सुनावणी घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे नोंदवून यथोचित निर्णय घ्यावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सफीयोद्दीन वलियोद्दीन काझी,रा.सिव्हील कोर्टाच्या पाठीमागे,गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल,नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. डी. बी. सरोदे, : अपिलार्थी

प्रोफेसर, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१

जन अपिलीय अधिकारी तथा :

संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६३४

२ सुनावणीची तारीख दि. २३-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ - श्री. सुभाष मनोहरराव बच्चुवार

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१

- डॉ. अब्दुल सामद

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०४-२०११

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ०३-०६-२०११

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०६-०७-२०११

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०७-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-१०-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १३-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११-०१-२०१२ च्या पत्रान्वये प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली होती. त्यामुळे प्रकरणात अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुध्दा अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ११-०४-२०११ च्या माहिती अर्जान्वये एकूण सहा मुद्दयावर तीन त्रयस्थांची माहिती मागितली आहे. दिनांक १३-०४-२०११ रोजी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नसल्यामुळे दिनांक १३-०४-२०११ रोजी आस्थापना विभागाला माहिती संकलीत करुन देण्याची विनंती केली. आस्थापना विभागाकडून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०५-२०११ रोजी प्राप्त झाली व त्याच दिवशी सदरची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्यात आली. यामध्ये मुद्दा क्रमांक a ची माहिती अपिलार्थीस देण्यात आली, मुद्दा क्रमांक b, d व e माहिती विद्यापीठाकडे उपलब्ध नाही व तसेच मुद्दा क्रमांक c व f ची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे असेही अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी दिनांक ०६-०७-२०११ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थीच्या या अपिलावर दिनांक २९-०७-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. प्रथम अपील सुनावणीच्य वेळी अपिलार्थी हजर होते. अपिलार्थी यांनी विनंती केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ३ आणि ६ ची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असली तरी शुल्क भरुन घेऊन त्याच्या प्रमाणित प्रती काढून अपिलार्थीस द्याव्यात, असा निर्णय प्रथम अपील सुनावणीच्या वेळी घेण्यात आला. त्यानंतर दिनांक २८-०८-२०११ रोजी अपिलार्थीस सदर माहितीसाठी शुल्क रुपये ४६० भरण्याबाबत कळविण्यात आले. अपिलार्थीने शुल्क भरल्यानंतर दिनांक १४-०९-२०११ रोजी माहितीची २०५ पृष्ठे अपिलार्थीस पाठविण्यात आली तथापि या माहितीमध्ये मुद्दा क्रमांक ६ बाबतच्या माहितीच्या प्रमाणित प्रती पुरविण्यात आल्या नाहीत व सदर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना त्याची बाजू मांडण्याची दोन वेळेस संधी देण्यात आली होती तथापि ते आजही उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती तसेच मुद्दा क्रमांक c ची माहिती प्रमाणित करुन अपिलार्थीस दिली आहे. तथापि मुद्दा क्रमांक f ची माहिती प्रमाणित करुन दिलेली नाही याकरिता मुद्दा क्रमांक f च्या माहितीच्या संदर्भातील प्रमाणित प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक f मधील माहिती संकेतस्थळावरुन काढून प्रमाणित करुन अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. डी. बी. सरोदे, प्रोफेसर, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. डी. बी. सरोदे, प्रोफेसर, : अपिलार्थी
पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-०१

जन अपिलीय अधिकारी तथा :
संचालक शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-०१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर - ०१<br>श्री. सुभाष मनोहर बच्चुवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर - ०१<br>- डॉ. अब्दुल सामद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०७-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-१०-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १७-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ११-०४-२०११ च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थांची एकूण सहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १३-०४-२०११ रोजी प्राप्त झाला. सदरची माहिती त्यांच्या कक्षेत नसल्यामुळे त्यांनी आस्थापना विभागास दिनांक १३-०४-२०११ रोजी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती देण्याकरिता कळविले. आस्थापना विभागाकडून दिनांक ११-०५-२०११ रोजी त्यांना माहिती प्राप्त झाली. त्यानंतर दिनांक १२-०५-२०११ रोजी अपिलार्थीस शुल्काचा भरणा करण्याकरिता पत्र देण्यात आले व अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक ०३-०६-२०११ रोजी माहिती पाठविण्यात आली. या माहितीमध्ये अपिलार्थीस मुद्दा क्रमांक a, e व f या मुद्यावर माहिती पाठविण्यात आली व मुद्दा क्रमांक b, c व d ची माहिती आस्थापना विभागाकडे नाही असेही अपिलार्थीस पत्राव्दारे कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा संचालक शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर यांच्याकडे दिनांक ०६-०७-२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २९-०७-२०११ रोजी निर्णय दिला की, मुद्दा क्रमांक २, ३ व ४ ची माहिती अपिलार्थीस २५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. विद्यापीठाकडे सदरची माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहिती पुरविण्यास मुदतवाढ देण्यात यावी अशी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती करण्यात आली व ही बाब अपिलार्थीस दिनांक २९-०८-२०११ रोजी कळविण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आस्थापना विभागाकडून माहिती दिनांक १३-०९-२०११ रोजी प्राप्त झाली व त्यांनी दिनांक १४-०९-२०११ रोजीअपिलार्थीस विनाशुल्क माहिती स्पीड पोस्टाने पाठविली आहे.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची दोन वेळेस संधी देण्यात आली होती तथापि ते दोन्ही वेळेस उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना मुद्दा क्रमांक B व D ची माहिती अद्यापपावेतो मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. याकरिता जन माहिती अधिकारी

यांनी या दोन मुद्दयांची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर - ०१ यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. डी. बी. सरोदे, प्रोफेसर, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम, : अपिलार्थी
घर नंबर १५/७७, मशायक मोहल्ला, मिनारा मस्जिदच्या
पाठीमागे, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त
कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१११४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. प्रविण मेगशेट्टी, तहसीलदार, न. पा. प्र. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०१-२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १८-०२-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२९-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे. जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे मार्फत आयोगास सादर करावा लागेल.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना अद्यापावेतो माहिती मिळाली नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजीच्या माहिती अर्जान्वये त्यांची सेवाविषयक एकूण १२ मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ही माहिती सात दिवसाच्या आत द्यावी असा जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजी निर्णय घेतला आहे. प्रथमदृष्ट्या अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती, कालावधी तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामग्री व मनुष्यबळ यांचा विचार न करता जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आढळून येत आहे.

प्रसंगवशात अपिलार्थी हे नगरपरिषद, उस्मानाबाद येथे कार्यरत होते. त्यांना त्यानंतर कायम करण्यात आले आहे. त्यांच्या सेवेच्या संदर्भातील पूर्वीच्या कागदपत्राची ते मागणी करत आहे. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या प्रमाणावर विविध मुद्दयावर माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

अपिलार्थी यांना याबाबत विचारणा केली असता अपिलार्थी यांनी स्वेच्छेने माहितीची व्याप्ती कमी केली व आयोगास विनंती केली की, त्यांना खालील माहिती मिळणे आवश्यक आहे.

१.	मुख्यमंत्री कार्यालयाच्या दिनांक ३०-०३-२००१ रोजीच्या पत्रान्वये आदेशित करण्यात आले होते की, अशा प्रकारे रोजंदारीवर काम करत असलेल्या कर्मचा-यांना सेवेत कायम करण्यात यावे त्या पत्राची प्रत.

२.	दिनांक ०१-०२-२००३ रोजी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी आदेश निर्गमीत केलेले आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ११-०३-२००३ रोजी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना कळविले आहे. या पत्रावर नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील पत्राच्या प्रती तसेच टिपणीच्या प्रती.

३.	दिनांक ०१-०१-१९९० ते २५-०८-२००९ पर्यंत या कालावधीत रोजंदारीवर नगर परिषद, उस्मानाबाद येथे कार्यरत होते या कालावधीत त्यांनी स्वाक्षरी केलेल्या हजेरीपटाच्या सत्यप्रती.

४.	नगरपरिषद, उस्मानाबाद मार्फत दिनांक १६-०९-२००३ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. त्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील पत्राच्या प्रती.

अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थी हे शारीरिकदृष्ट्या विकलांग आहेत. त्यांच्या स्वतःच्या सेवेसंदर्भातील ही माहिती असल्याने त्यांना ही माहिती मिळणे आवश्यक आहे. याकरिता सदर प्रकरणाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती नगरपरिषद, उस्मानाबाद यांच्याशी संबंधित आहे. वर नमूद केलेल्या माहितीसंदर्भातील नस्ती व माहितीच्या छायांकीत प्रती आयोगापुढे दिनांक २०-०३-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता होणा-या पुढील सुनावणीच्या वेळी मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद श्री. दिलीप देशमुख यांना समक्ष सादर कराव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २०-०३-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम, घर नंबर १५/७७, मशायक मोहल्ला, मिनारा मस्जिदच्या पाठीमागे, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम,<br>घर नंबर १५/७७, मशायक मोहल्ला, मिनारा मस्जिदच्या पाठीमागे, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१११५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. प्रविण मेगशेट्टी, तहसीलदार, न. पा. प्र. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०३-२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०१-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०२-२००९<br>फेरसादर दि.<br>२९-०४-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे. जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे मार्फत आयोगास सादर करावा लागेल.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक २३-०३-२००६ च्या माहिती अर्जान्वये त्यांच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात एकूण पाच मुद्दयांवर माहिती मागितली आहे. त्यांना अद्यापपावेतो ही माहिती मिळालेली नाही तसेच त्यांच्या प्रथम अपिलावरही सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आलेला नाही. अपिलार्थी यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांना या माहितीच्या संदर्भात खालील माहिती फक्त अवश्यक आहे.

१. दिनांक ०१-०१-१९९० ते २००६ पर्यंत अपंगाची किती पदे उपलब्ध होती व किती पदावर नियुक्ती करण्यात आली आहे याबाबतची कागदपत्रे.

अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थी हे शारीरिकदृष्ट्या विकलांग आहेत. त्यांच्या सेवेसंदर्भातील ही माहिती असल्याने त्यांना ही माहिती मिळणे आवश्यक आहे. याकरिता सदर प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती नगरपरिषद, उस्मानाबाद यांच्याशी संबंधित आहे. वर नमूद केलेल्या माहितीच्या नस्ती व माहितीच्या छायांकीत प्रती आयोगापुढे दिनांक २०-०३-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता होणा-या पुढील सुनावणीच्या वेळी मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद श्री. दिलीप देशमुख यांना समक्ष सादर कराव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २०-०३-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम, घर नंबर १५/७७, मशायक मोहल्ला, मिनारा मस्जिदच्या पाठीमागे, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. एम. ए. सिद्दीकी,<br>मंगळवार पेठ, हावळे गल्ली, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बी. एम. वांजरखेडकर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००९ |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. २८-०१-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०९-०७-२००९ च्या माहिती अर्जान्वये तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. मागितलेल्या माहितीमध्ये चौकशी अहवाल अपेक्षित आहे व चौकशी अद्याप पूर्ण झाली नाही त्यामुळे देता येत नाही असे दिनांक ०४-०८-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले आहे.

विहित मुदतीत सद्यस्थिती कळविली आहे. तथापि २००८ मध्ये चौकशीचा अर्ज प्राप्त झाला असून त्यावर अद्याप चौकशी पूर्ण झाली नाही असे आयोगास दिसून येत आहे. ही गंभीर बाब आहे. याकरिता प्रकरणात जिल्हाधिकारी, बीड यांनी व्यक्तिशः चौकशी करुन पुढील कार्यवाही करावी. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीस प्रकरणाची सद्यस्थिती एका महिन्याच्या आत नोंदणीकृत टपालाने कळविण्यात यावी.

२. जिल्हाधिकारी, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणात कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद**	**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२**	**खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एम. ए. सिद्दीकी, मंगळवार पेठ, हावळे गल्ली, अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तांदळे उध्दव किसनराव,<br>तांदळे निवास, हनुमान चौक, शाहुनगर, जालना रोड, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड - श्री. आत्माराम रंगनाथ वाघमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०८-०४-२००९ च्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद, अपिलार्थी यांचे दिनांक ०४-०५-२००९ चे प्रथम अपील व त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय यांच्या प्रती, आयोगास सादर करणे आवश्यक आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी काही कालावधी देण्याची विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे व प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १०-०४-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तांदळे उध्दव किसनराव, तांदळे निवास, हनुमान चौक, शाहुनगर, जालना रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वसंतराव मारुती जोगदंड, : अपिलार्थी
मु. पो. बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बर्दापूर,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई,
जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड - श्री. रोकडे ए. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबाजोगाई, जिल्हा बीड - श्री. नागरगोजे व्ही. एम. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०१-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील दोन मुद्दयांवर माहिती मागितली आहे.

१. ग्रामपंचायतीने दिनांक ३१-०५-२००८ रोजी घेतलेल्या ठरावाची सत्यप्रत.

२. मातीचा वापराकरिता रॉयल्टी दिली त्याची प्रत.

वरील दोन मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक १ ची सत्यप्रत अपिलार्थीस दिनांक ०५-१०-२००९ रोजी दिली आहे. त्यामध्ये माती उचलण्यास ना हरकत प्रमाणपत्राबाबतचा निर्णय आहे. ग्रामपंचायत कडून फक्त ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. माती उचलण्याचे आदेश तहसील कार्यालयातर्फे देण्यात येतात. रॉयल्टी सुध्दा तहसील कार्यालयामध्ये भरावी लागते. त्यामुळे ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. तथापि माहिती देण्यास विलंब झाला आहे. भविष्यात त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहिती अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती देण्याची दक्षता घ्यावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वसंतराव मारुती जोगदंड, मु. पो. बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. सुंदर मारोतराव गडद,<br>रा. चिंचखडी, पो. भावठाणा, तालुका अंबाजोगाई,<br>जिल्हा बीड | : अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, सेवा सहकारी संस्था म. भावठाणा,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका सह निबंधक, सहकारी संस्था, तालुका अंबाजोगाई,<br>जिल्हा बीड | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, सेवा सहकारी संस्था म. भावठाणा,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, जिल्हा बीड<br>- श्री. पोतगले व्ही. एल. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३१-१०-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ११-११-२००९

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १५-०९-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये सेवा सहकारी संस्था म. भावठाणा या सहकारी संस्थेमधील त्यांच्या स्वतःच्या खाते उता-याबाबत माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०९-२००९ रोजी सदर अर्ज सचिव, सेवा सहकारी संस्था म. भावठाणा यांच्याकडे वर्ग केला आहे. तथापि सदर संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही तथापि अपिलार्थी हे सोसायटीचे सभासद आहेत त्यामुळे त्यांना सोसायटी कायद्यान्वये माहिती देता येऊ शकते आणि अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे, असे त्यांना कळालेले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुंदर मारोतराव गडद, रा. चिंचखडी, पो. भावठाणा, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, सेवा सहकारी संस्था म. भावठाणा, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडके,<br>मु. पो. सुलेमान देवळा, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. एम. गीते, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी मौजे आंभोरा, तालुका आष्टी येथील स. नं. ३६ वर आष्टी येथील मा. दिवाणी न्यायालय यांचेकडील रे. मु. नं. ६५/९४ नुसार विहिरीत आठ आणे हिश्याची नोंद लावणेबाबत तहसील कार्यालय, आष्टी मध्ये दिनांक २५-११-२००८ व दिनांक ०२-०३-२००९ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना मिळाली तथापि ती अपूर्ण आहे. जी माहिती मिळाली आहे त्याबाबत अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या आठ आणे हिश्श्याची नोंद नाही ती घेण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी त्यांचा विहिरीमध्ये हिस्सा मागत आहेत व ही प्रक्रिया महसूल खात्याच्या नियमाप्रमाणे प्रगतीपथावर आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांचे त्यांच्या जमिनीतील विहिरीची नोंद घेण्याबाबतचे गा-हाणे दिसत आहे. ही प्रशासकीय बाब आहे याकरिता त्यांना महसूल विभागाकडे पाठपुरावा करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडके, मु. पो. सुलेमान देवळा, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामराव नागनाथ नागापुरे,<br>व्दारा पत्रकार सुधीर रामराव नागापुरे, खंडोबा मैदान,<br>माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>माजलगांव, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>माजलगांव, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम. एच. इनामदार, वरिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. ए. ए. बनसोडे, कनिष्ठ लिपीक | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०५-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ३१-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०६-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २४-२-२०१२ रोजीच्या पत्राद्वारे सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली आहे, ती मान्य करण्यात येत आहे. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यात येत आहे. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १०-०४-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामराव नागनाथ नागापुरे, व्दारा पत्रकार सुधीर रामराव नागापुरे, खंडोबा मैदान, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विठ्ठल बळीराम शेंडगे, : अपिलार्थी
रा. तेलगांव (खुर्द), पो. तालखेड, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, माऊली माध्यमिक विद्यालय, एकदरा,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, माऊली माध्यमिक विद्यालय, एकदरा,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-०२-२०१२ रोजीच्या पत्रान्वये सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यात येत आहे. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १०-०४-२०१२ रोजी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल बळीराम शेंडगे, रा. तेलगांव (खुर्द), पो. तालखेड, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माऊली माध्यमिक विद्यालय, एकदरा, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अच्युतराव आप्पाराव नाईकवाडे, : अपिलार्थी
रा. हिवरगव्हाण,पो. उपळी, तालुका वडवणी, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडवणी,
जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, वडवणी, तालुका वडवणी,
जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, वडवणी, जिल्हा बीड - श्री. तळेकर बी. बी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड - श्री. चितळे बी. जी. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २०-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अच्युतराव आप्पाराव नाईकवाडे, रा. हिवरगव्हाण,पो. उपळी, तालुका वडवणी,

जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. देशमुख जालींदर धोंडीराम,<br>रा.मस्साजोग, ता.केज, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (निवडणूक),<br>तहसील कार्यालय,केज, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, केज,<br>जि. बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देशमुख जालींदर धोंडीराम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय,केज, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.बिरादार के.जि., नायब तहसीलदार (म-२), तहसील कार्यालय,केज,जि.बीड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, जि. बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१० |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील कागदपत्रे पाहण्यात आली. आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०१.२००८ ते ०५.११.२००९ पर्यंतच्या कालावधीची एकूण २ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. पहिल्या मुद्याद्वारे -तहसील कार्यालातील शासकीय वाहनासंदर्भातील माहिती व दुसऱ्या मुद्याद्वारे दि. ०१.०१.२००८ ते दि.०५.११.२००९ या कालावधीमधील वेगवेगळया निवडणूक आचारसंहितेसंदर्भातील माहिती मागितल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की,उपरोक्त कालावधीमध्ये निवडणूक कालावधीत अधिग्रहित केलेल्या इतर विभागाच्या वाहनांच्या लॉगबुकचा तपशील संकलीत करण्यास कालावधी लागला. अपिलार्थी यांनी त्यांनी मागितलेली वाहनासंदर्भातील माहिती फक्त तहसील कार्यालयापुरती मर्यादित आहे, असे मत मांडले. आज जन माहिती अधिकारी यांनी माहिती सोबत आणलेली आहे. माहितीच्या संचाची झेरॉक्स प्रत आयोगाचे कामकाज संपण्याच्या आत अपिलार्थीस देण्यात यावी, असे आयोगाने निदेश दिले. अपिलार्थीस आजच माहिती प्राप्त होत असल्यामुळे या माहितीची पाहणी प्रथम करावी व त्यामध्ये काही अपूर्ण आढळून आल्यास जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवावे. पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित मुद्देनिहाय माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय, केज,जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देशमुख जालींदर धोंडीराम,रा.मस्साजोग, ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक),तहसील कार्यालय,केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हरीभाऊ विश्वनाथ कुरे, : अपिलार्थी
रा. पुनंदगाव, पो. ता. माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
माजलगाव, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.एम.एच.इनामदार, वरिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.बनसोडे ए.ए.,कनिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०२.२०१० |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०२.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे ८४ पृष्ठांची माहिती पाठविलेली आहे. यासंदर्भातील पोच दिसून येत आहे.

अपिलार्थी यांना उशिरा माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई, जि.बीड यांनी प्रकरणात चौकशी करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सक्त ताकीद देण्यात येऊन भविष्यात अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहिती अर्जासंदर्भात दक्ष राहण्याचे सूचित करणे जरुरी आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरीभाऊ विश्वनाथ कुरे,रा. पुनंदगाव, पो. ता. माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा  कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळनाथ एकनाथ शिंदे, : अपिलार्थी
रा.वडवणी, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०२.२०१० |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन सद्यपरिस्थिती अवगत होऊ शकत नाही. सदरचे प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती मिळाली किंवा कसे, विहित मुदतीत मिळाली किंवा नाही इ.बाबींची पाहणी

करावी व अपिलार्थीस दिलेली माहिती योग्य आहे काय, हे पहावे व अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला असल्यास संबंधिताविरुध्द चौकशी करावी.तसेच अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती मिळाली नसल्यास अपिलार्थीस देय होत असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी विनामूल्य देतील, असे पहावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळनाथ एकनाथ शिंदे, मु.पो.गोपाळनगर, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शहाजी गणपतराव टमके, : अपिलार्थी
रा. माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगाव, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगाव, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शहाजी गणपतराव टमके | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील - ॲड.आनंद आबासाहेब देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लिपीक, नगर परिषद, माजलगाव, जि.बीड-श्री. सुरेश पुरुषोत्तम जोशी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगाव, जि.बीड-श्री. पाटील पंडीत खंडू | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०२.२०१० |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगास उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांचे घर क्र. २१/३/१ यासंदर्भात विविध कर आकारणीपोटी सन १९८५-८६ पासून २००९-२०१० पर्यंत भरलेल्या रकमांसंदर्भात माहिती मागितली आहे. त्यापैकी त्यांना सन १९८५-८६ ते १९९६-९७ पर्यंतची माहिती मिळालेली नाही.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. यासाठी अपिलार्थी यांनी वेळोवेळी भरणा केलेल्या करासंदर्भात अपिलार्थीस प्राप्त झालेल्या पावत्यावरुन संबंधित रजिस्टरमधील नोंदी असल्यास त्या पृष्ठांच्या प्रती अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात मिळू शकतील.

या सर्व बाबी पाहता, सदरील माहितीचे रजिस्टरच्या प्रतीची पाहणी करण्याकरिता अपिलार्थीस एक दिवस निश्चित करण्यात यावा व त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद, माजलगाव, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शहाजी गणपतराव टमके, मु.वॉर्ड क्र. २३/३/१, नवा मोंढा गजानन नगर, माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पाटील भारत नरहारी, : अपिलार्थी
रा. सिमरी पारगाव, पो.उमरी (बु.), ता.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
बीड
जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी, :
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पाटील भारत नरहारी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग,बीड - श्री. बी.एस. केंद्रे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. आर.यु.राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगासमोर कथन केले की, त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती मिळाली आहे. तथापि खालील माहिती मिळालेली नाही.

माजलगाव तालुक्यातील स्वाभिमान योजनेअंतर्गत सन २००४ पासून दि.१७.०१.२००९ पर्यंत जमिन पाहणी अहवाल व लाभार्थीना वाटप केलेल्या आदेशाच्या प्रती तसेच संबंधित लाभार्थींचे ७/१२ चे उतारे बोजासह अशी माजलगाव तालुक्यातील एकूण ३४ शेतकऱ्यांची माहिती.

उपरोक्त माहिती अपिलार्थीस देय होत आहे. आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. यासंदर्भात स्थळप्रतीवर अपिलार्थी यांची पोच स्वाक्षरी आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी जमीन पाहणी अहवाल सोबत आणलेला आहे. तथापि ७/१२ च्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, असे आयोगासमोर त्यांनी कथन केले. आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस उपलब्ध माहिती देण्यात आली.अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाटील भारत नरहारीराव, मु.पो.सिमरी पारगाव, पो.उमरी (बु.), ता. माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी,रा.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नागरी सहकारी पतसंस्था विभाग,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,पुणे
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर निबंधक सहकारी संस्था,
तपासणी व निवडणूक, म.रा.पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नागरी सहकारी पतसंस्था विभाग, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,पुणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.जी.जी.मावळे, तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.०७.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०१.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०२.२००९ (पुणे खंडपीठाकडे प्राप्त)<br>दि. २२.०२.२०१० (औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त) |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०७.२००८ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात दि. २८.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. यावर अपिलार्थी यांनी दि. ०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यान अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यामध्ये यासंदर्भात काही पत्रव्यवहार झालेला असून अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. २९.०९.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. तथापि अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे अपिलार्थी हे अपिलाच्या सुनावणीस हजर राहत नसल्यामुळे व त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०१.२००९ अन्वये खारीज केले आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. जी माहिती पुस्तकाच्या स्वरुपात सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, ती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.रामचंद्र दिनकर रत्नपारखी, रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड, बीड - ४३११२२.

२. जन माहिती अधिकारी, नागरी सहकारी पतसंस्था विभाग, सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री.शेख छन्नुमियाँ शेख कडुमियाँ,<br>रा.तळणेवाडी, ता.गेवराई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी नायब तहसीलदार, शेवगाव,<br>जि. अहमदनगर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, शेवगाव, जि.अहमदनगर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - निवासी नायब तहसीलदार, शेवगाव,जि. अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. नितीन बनसोडे, लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, शेवगाव, जि.अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०२.२०१० |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. १०.१२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, ती देण्यात आली आहे. काही माहिती जीर्ण स्वरुपात असल्यामुळे ती दाखविण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांची बाजू आयोगास समजू शकली नाही. याकरिता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत जेणेकरुन आवश्यक काही कागदपत्रे अपिलार्थीस मिळू शकतील, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, शेवगाव, जि.अहमदनगर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख छन्नुमियाँ शेख कडुमियाँ, मु.पो. तळणेवाडी, ता.गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,शेवगाव,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शेवगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वीर आसाराम नरहरराव,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, न्यु हायस्कूल सिरसाळा,<br>ता. परळी वै., जि.बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ,<br>देवगिरी महाविद्यालय विद्यार्थी वसतीगृहाजवळ, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, न्यु हायस्कूल सिरसाळा,ता. परळी वै., जि.बीड - श्री. कुमार अमृतराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांचे वकील ॲड. संतोष भरड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांचे वकील उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व संस्थेचे वकील यांनी आयोगास प्रकरणात पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

वरील बाबी विचारात घेता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०४.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते.अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेण्यासाठी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वीर आसाराम नरहरराव,महाराष्ट्र हाऊसिंग कॉलनी, घर नं. ८३, स्वस्त धान्य दुकान नं. ३० च्या दक्षिणेस, धानोरा रोड, बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यु हायस्कूल सिरसाळा,ता. परळी वै., जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांना अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, : अपिलार्थी

रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन),
संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कचरुलाल बस्तीमल जैन | : | उपस्थित |
| ३.२ | सध्याचे जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक,कार्यालय जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड- श्री. आर.एम.मोरे | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी व सध्याचे अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था, बीड-श्री. ए.एस.कदम | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - श्री. ए.एल.घोलकर, जिल्हा उपनिबंधक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०२.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२.०३.२०१०

आज सुनावणीसाठी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांनी मागितलेली कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अधिनियमात बसत नाही, म्हणून दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे सर्व मुद्दे प्रश्नार्थक, खुलासेवजा व त्यांच्या जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबतचे आहेत, अशा स्वरुपाची माहिती देणे माहिती या संज्ञेत येत नाही, म्हणून देण्यात आली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांचा दि. २२.१२.२००९ रोजीच्या मूळ माहिती अर्जामध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड संदर्भात एकूण ११ मुद्दे नमूद केले आहेत. तथापि या अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही मुद्यांची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात मागितली नसून खुलासा, कार्यवाही अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारची कार्यवाही करणे अथवा त्यासंदर्भात खुलासे, स्पष्टीकरण देणे ही प्रक्रिया अधिनियमातील तरतुदीमध्ये येत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, रा. जुना मोंढा, बीड, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, कार्यालय जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| सौ. जानकी ग्यानोबा फलके,<br>रा. गेवराई, ता. गेवराई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, गेवराई, जि. बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई,जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - सौ. जानकी ग्यानोबा फलके | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड.एस.के.निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, गेवराई, जि.बीड - श्री. एस.के.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई,जि.बीड - श्री. सय्यद आर.के. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०१० |

आज सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे वकिलांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी गेवराई येथील सरस्वती कॉलनी नं. २ मध्ये १९८५ पासून आजपर्यंत नाल्याच्या बांधकामाबाबत एकूण ३ मुद्यांवर मागितली आहे. माहितीचा कालावधी सन १९८५ ते दि. ०६.११.२००९ असा आहे. त्यांना विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही म्हणून त्यांनी दि. ११.१२.२००९ रोजी प्रथम अपील केले. जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जास प्रतिसाद दिलेला आहे. तथापि माहितीच्या प्रती मिळालेल्या नाहीत. दि. १०.१२.२००९ रोजीचे पत्र प्रत्यक्षात दि. १९.१२.२००९ रोजी पोस्टात टाकले व दि. २१.१२.२००९ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाले. अपिलार्थीने प्रथम अपील दि. ११.१२.२००९ रोजी दाखल केले. त्या संदर्भात सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई,जि.बीड यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, सदर माहितीचा अर्ज दि. ०६.११.२००९ रोजी केला, त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी पदावर दुसरे अधिकारी कार्यरत होते. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सरस्वती कॉलनी क्र.२ शी संबंधित आहे. ही कॉलनी सन १९८९ मध्ये नगर परिषदेकडे हस्तांतरित झाली, त्यामुळे त्यापूर्वीची माहिती त्यांच्याकडे नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस खालील माहिती आवश्यक आहे, असे दिसून येत आहे..

१) सरस्वती कॉलनी क्र. २ ही कॉलनी एकूण २५ प्लॉटची आहे. प्रश्नाधीन नालीची लांबी अंदाजे ४००० फूट आहे. या नाली संदर्भात आजपर्यंत झालेल्या बांधकामासंदर्भातील माहिती जसे वर्क ऑर्डरच्या प्रती, कंत्राटदाराचे नाव याच्या प्रती देण्यात याव्यात.

२) अपिलार्थी यांनी दि. ०६.०३.२००४, २३.०३.२००४, १०.०५.२००४,१६.०७.२००४ व दि. २०.०७.२००९ रोजीचे अर्ज व स्मरणपत्रांन्वये केलेल्या तक्रारीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही/चौकशी/आदेश इ.च्या प्रती.

वरील माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. यासाठी अपिलार्थीस वरील दोन मुद्यांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सर्व अभिलेखांची अपिलार्थीस पाहणी दिल्यास अपिलार्थीस आवश्यक काही माहिती मिळू शकेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, गेवराई, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. जानकी ग्यानोबा फलके, रा. सरस्वती कॉलनी नं. २, गेवराई,ता.गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, गेवराई, जि.बीड
यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मधुकर संभाजीराव वाघमारे,<br>गणेशनगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी ॲडव्होकेट एस. के. निकम यांचेसह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. नरेंद्र भागवत रडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. सामसे जी. के. उप कार्यकारी अभियंता, विभाग, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०९-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०१-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचे वकिलासह, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांच्या वकिलाने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०८-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये माहिती मागितली आहे आणि हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०९-२००९ रोजी प्राप्त झालेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, बीड यांच्याकडे दिनांक ०५-११-२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावर त्यांनी दिनांक ०१-१२-२००९ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी उर्वरित माहिती अपिलार्थीस तीन दिवसात विनामूल्य द्यावी असा निर्णय दिला. यानंतर दिनांक १२-१२-२००९ रोजी सुमारे ५५ दिवसांच्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये व्यक्तिशः माहिती मागितली आहे. ज्या वेळी व्यक्तिशः माहिती मागण्यात येते त्यावेळी ती व्यक्तिशः घेण्याची जबाबदारी अपिलार्थीची येते. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन ठेवली होती परंतु अपिलार्थी उपस्थित झाले नाहीत म्हणून माहिती देता आली नाही असा जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केलेला आहे. याबाबतची नोंद जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील सुनावणीनंतर घेतलेल्या निर्णयामध्ये घेतलेली आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळालेली आहे. तथापि विलंबाने मिळालेली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार असल्यामुळे व अपिलार्थी यांनी व्यक्तिशः संपर्क न साधल्याने माहिती दिली नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे, ही बाब मान्य करण्याजोगी आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ हा प्रभावी राबविण्यासाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांचाही तितकाच सहभाग व प्रतिसाद आवश्यक आहे. अपिलार्थी यांच्या वकिलाचे असे म्हणणे आहे की, माहिती चुकीची मिळाली आहे त्याकरिता ते जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या वरिष्ठांकडे त्यांना आवश्यक वाटल्यास त्यांचे म्हणणे मांडू शकतात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर संभाजीराव वाघमारे, गणेशनगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भारत मारोतीराव सोनवणे,<br>चुत्रुम्माँ चौक, मेन रोड, माजलगांव, तालुका माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती, माजलगांव, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव,<br>जिल्हा बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, मनूर,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. यादव रामकृष्ण गणपतराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव,<br>जिल्हा बीड - श्री. मोरे अरुण सदाशिव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-०३-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १६-०२-२००९ च्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत मनूर येथील जुने घर क्रमांक ३११, मालमत्ता (पी. टी. आर.) चालू नक्कल सन २००८/२००९ च्या प्रती मागितल्या आहेत. याच माहिती अर्जावर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग खंडपीठाकडे दिनांक २६-०६-२००९ रोजी व्दितीय अपील केले होते. त्यावर सुनावणी होऊन प्रकरणात औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २९-१०-२०१० रोजी निर्णय दिला आहे व अपील निकाली काढण्यात आले आहे. त्याच माहिती अर्जासंदर्भात विचाराधीन दिनांक ०४-०३-२०१० चे व्दितीय अपील आहे. मूळ माहितीचा अर्ज दिनांक १६-०२-२००९ चा असून दोनही प्रकरणात एकच अर्ज आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीच्या दिनांक १६-०२-२००९ च्या माहिती अर्जावर आयोगाने यापूर्वी सुनावणी घेऊन निर्णय दिला असल्याकारणाने सदरचे व्दितीय अपील निष्प्रभ ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भारत मारोतीराव सोनवणे, चुत्रुम्माँ चौक, मेन रोड, माजलगांव, तालुका माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, मनूर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. ढोकणे विठ्ठल नारायण,<br>मु. नागापूर (बु.), पो. म्हाळस जवळा, तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, उपविभाग, बीड - श्री. वागलगावे धर्मराज रामराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जाधव उत्तरेश्वर आश्रुबा, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मौजे नागापूर (बु.), तालुका बीड येथील भारत निर्माण योजने अंतर्गत कायमस्वरुपी नळयोजनेच्या कामाची मोजमापण पुस्तकाची झेरॉक्स प्रत, अंदाजपत्रकाची झेरॉक्स प्रत, लोकवर्गणी भरणा केलेल्या लोकांची यादी, पाणीपुरवठा कमिटीची यादी, सामाजिक लेखा कमेटीची यादी व महिला दक्षता कमेटीची यादी अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी ही माहिती व्यक्तिशः घेणार होते. त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिनांक २२-०२-२०१० रोजी संकलीत करुन अपिलार्थीस देण्यात आली आहे. परंतु भारत निर्माण योजनेअंतर्गत विहिरीचे खोदकाम चालू असल्याने मोजमाप पुस्तिकाच्या झेरॉक्स प्रती देता आल्या नाहीत. मोजमाप पुस्तिका प्राप्त झाल्यावर दिनांक १८-०२-२०१२ रोजी अपिलार्थीस देण्यात आलेल्या आहेत. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते तथापि त्यांनी व्यक्तिशः माहिती घेतली नाही त्यामुळे ती माहिती त्यांना नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे.

आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे व्दितीय अपील दिनांक ११-०३-२०१० चे आहे व त्यानंतर त्यांना माहिती मिळाली आहे. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी आणि अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी.जन माहिती अधिकारी यांनी भविष्यामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ कायद्यान्वये त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहिती अर्जावर विहित मुदतीत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ढोकणे विठ्ठल नारायण, मु. नागापूर (बु.), पो. म्हाळस जवळा, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, उपविभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गलांडे बाळासाहेब परशुराम,<br>मु. पो. शिवाजीनगर, कळंब रोड, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गलांडे बाळासाहेब परशुराम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड - श्री. देशमुख बी. एम. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २५-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गलांडे बाळासाहेब परशुराम, मु. पो. शिवाजीनगर, कळंब रोड, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. निलावाड उत्तम सयाजीराव,<br>मंडळ अधिकारी, लोखंडी सावरगांव, तालुका अंबाजोगाई,<br>रा. हाऊसिंग सोसायटी, राम सिरसाळकर यांचे घर,<br>अंबाजोगाई, जिल्हा बीड | : अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जाधव के. एन. लिपीक | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५-०९-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १५-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ३०-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०२-२०१२ रोजीच्या पत्रान्वये त्यांची एच. एस. सी. परीक्षेकरिता बैठ्या पथकात नियुक्ती झाल्याने प्रकरणात सुनावणीसाठी त्यांना पुढील तारीख देण्याची विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे व प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ११-०४-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलावाड उत्तम सयाजीराव, मंडळ अधिकारी, लोखंडी सावरगांव, तालुका अंबाजोगाई, रा. हाऊसिंग सोसायटी, राम सिरसाळकर यांचे घर, अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी

वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आठवले अशोक कचरु,<br>व्दारा, कांबळे निवास, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, आनंदनगर, नगर रोड, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - (१) श्री. सिताके, कार्यालयीन अधीक्षक, उपसंचालक कार्यालय, लातूर | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - (२) श्री. डॉ. नागांवकर | | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, (अर्थसंकल्प व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | : | अनुपस्थित |
| ३.६ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. - श्री. अरगडे आर. पी., कार्यालयीन अधीक्षक, उपसंचालक कार्यालय, लातूर | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २२-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, (अर्थसंकल्प व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, (अर्थसंकल्प व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आठवले अशोक कचरु, व्दारा, कांबळे निवास, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहा-जवळ, आनंदनगर, नगर रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, (अर्थसंकल्प व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल हफीज सिद्दीकी, : अपिलार्थी
रा. सदर बाजार चौक, मस्जिदसमोर, अंबाजोगाई,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अब्दुल हफीज सिद्दीकी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>उस्मानाबाद - श्री. एम. एम. पाटील | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>उस्मानाबाद - श्री. एस. जी. देशपांडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०१-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण सात मुद्दयावर कंत्राटदाराचे नाव, कामाचे नांव, कार्यारंभ अ. क्र. व दिनांक, देयकाचा प्रकार, रोखवही प्र. क्र. व दिनांक, सुरक्षा ठेवीपोटी कपात केलेली रक्कम व इतर माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती ती दिनांक १९-१२-२००९ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस देण्यात आली, तसेच जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत तसे कळविण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी तक्त्यामध्ये माहिती मागितली आहे ती देण्यात आली नाही, तसेच काही मुद्दयांवर माहिती निरंक आहे असे कळविले आहे व अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने ठेवणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये दिलेल्या माहितीच्या व्याख्येनुसार जी माहिती उपलब्ध आहे ती तशा स्थितीत देय होते. संस्करण करुन माहिती देणे अभिप्रेत नाही. अतः अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देय होत नाही. काही मुद्दयाबाबत माहिती निरंक आहे असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे त्यावर अपिलार्थीस आवश्यक असल्यास ते संबंधित प्रशासकीय विभागाकडे त्यांचे म्हणणे मांडू शकतात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०२-२०१२**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल हफीज सिद्दीकी, रा. सदर बाजार चौक, मस्जिदसमोर, अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिंदे जितेंद्र रामभाऊ,<br>धनश्री बिगरशेती नागरी सह. पतसंस्था मर्या. आष्टी,<br>शनिमंदिराच्या पाठीमागे, पहिला मजला, आष्टी,<br>तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. शेंडे जे. डी., अ. का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २१-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली एकूण दोन मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस दिनांक २१-०३-२०१० रोजी देण्यात आली आहे. माहितीचा कालावधी दिनांक ०८-१२-२००६ ते २३-११-२००९ असा आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. याबाबत अपिलार्थी यांनी तहसीलदार, आष्टी यांना दिनांक २१-०३-२०१० च्या पत्रान्वये पोच दिली आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंदे जितेंद्र रामभाऊ, धनश्री बिगरशेती नागरी सह. पतसंस्था मर्या. आष्टी, शनिमंदिराच्या पाठीमागे, पहिला मजला, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. दैवशाला बबन शिरोळे, : अपिलार्थी
मु. बटनवाडी, पो. कडा (साखर कारखाना),
तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक, निबंधक कार्यालय, आष्टी,
तालुका आष्टी, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, निबंधक कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड - श्री. एस. पी. ससाने | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्र), अधिन जिल्हा उप निबंधक कार्यालय, बीड - श्री. ए. एस. कदम | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १५-०३-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती मिळाली आहे तथापि ती खोटी व अपूर्ण मिळाली आहे, असे मोघमपणे नमूद केले आहे नेमके नमूद केलेले नाही. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. दैवशाला बबन शिरोळे, मु. बटनवाडी, पो. कडा (साखर कारखाना), तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, निबंधक कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्र), अधिन जिल्हा उप निबंधक कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. इंदुबाई बापुराव सिरसट, : अपिलार्थी
गजानन नगर, नाळवंडी रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री. बी. बी. सिरसट | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी ,जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत आहे. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ११-०४-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. इंदुबाई बापुराव सिरसट, गजानन नगर, नाळवंडी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.मुंजाळ सोपान देवराव, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५४९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०३.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०८.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०३.२०१० (फेरसादर ,दि. १९.०३.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या संदर्भात दिलेल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली किंवा कसे यासंदर्भात सद्यपरिस्थिती अवगत होऊ शकत नाही. यासाठी आयोगामार्फत सूचित करण्यात येत आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बीड यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर पुन्हा सुनावणी घेऊन यथोचित निर्णय घ्यावा. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नसल्यास अपिलार्थीस जन माहिती अधिकारी माहिती देतील, या दृष्टीकोनातून दोनही बाजूंचे म्हणणे नोंदवून मुद्देनिहाय यथोचित निर्णय पारित करावा, या निष्कर्षात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड यांनी अपिलार्थीच्या दि.०३.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मुंजाळ सोपान देवराव,रा.ग्रामसेवक कॉलनी, नवीन नगर, बालेपीर,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.देशमुख हनुमंत वसंतराव,<br>रा. अंबाजोगाई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन सद्यपरिस्थिती अवगत होऊ शकत नाही. सद्यपरिस्थितीचा विचार करण्यासाठी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन यथोचित निर्णय घ्यावा. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना माहिती मिळाली नसल्यास जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देतील, या दृष्टीकोनातून अपिलार्थी यांच्या दि. ०१.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपिलासंदर्भात दोनही बाजूंचे म्हणणे नोंदवून अधिनियमातील तरतुदीनुसार मुद्देनिहाय यथोचित निर्णय पारित करावा, या निष्कर्षात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांनी अपिलार्थीच्या दि.०१.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देशमुख हनुमंत वसंतराव,द्वारा श्री. माणिक पांडे निवास, भट्ट गल्ली, अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी,जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हनुमान बाबासाहेब गोंजारे,<br>रा. तळेवाडी, ता.गेवराई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड - श्री. ए. एल.रुमणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड - श्री. आर.बी.रोडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांचे द्वितीय अपील आयोगापुढे दि. १५.०३.२०१० रोजी त्यांच्या वकिलामार्फत सादर केले आहे. आज सुनावणीस ते स्वतः अथवा त्यांचे वकिल उपस्थित नाहीत. त्यांनी त्रयस्थामार्फत त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केला. सदर युक्तिवाद दाखल करुन घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दि.०१.०१.२००६ ते ३०.११.२००९ अशा चार वर्षांच्या कालावधीची आहे व यामध्ये त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग,बीड यांच्याकडून अदा केलेल्या सर्व देयकांच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती खूप विस्तृत असल्यामुळे मागितलेल्या माहितीचे अभिलेखे पाहणीसाठी कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येतील, असे दि. ३०.१२.२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत कळविले आहे व पाहणीनंतर काही कागदपत्रांच्या प्रती आवश्यक असल्यास त्याही देण्यात येतील, असेही कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,बीड यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी करावी व त्यापैकी आवश्यक असलेल्या नेमक्या कागदपत्रांच्या छायाप्रती जन माहिती अधिकारी यांनी पुरवाव्यात. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नव्हते.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांनी चार वर्षे कालावधीची विस्तृत माहिती मागितली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(ञ)मध्ये स्पष्ट केलेल्या माहितीचा अधिकार या व्याख्येमध्ये माहितीची पाहणी देणे हा पहिला पर्याय आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहितीची पाहणी देण्यासंदर्भात घेतलेला निर्णय योग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तथापि अशी पाहणी करण्यास अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हनुमान बाबासाहेब गोंजारे,रा. तळेवाडी, ता.गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.वाजेद खान, : अपिलार्थी
बालेपीर, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - ॲड.वाजेद खान | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगातर्फे गंभीर दखल घेण्यात येत आहे. त्यांना बाजू मांडण्याची संधी देण्यात येत आहे. यासाठी आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १२.०४.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. वाजेद खान, बालेपीर, अजमेरनगर, भक्ती रोड, बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. आसाराम ग्यानबा कांदे,<br>रा. चोपनवाडी, पो. दिंद्रुड, ता.माजलगाव, जि. बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव,जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>विभाग,अंबाजोगाई, जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आसाराम ग्यानबा कांदे | : | उपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव,जि.बीड - श्री. बी.डी. साळवे | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. तडकलकर एस.बी., कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, सध्याचे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सध्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव,जि.बीड, श्री. एम.डी.शिंदे व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई, जि.बीड श्री. डी.डी.चाटे यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १२.०४.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.आसाराम ग्यानबा कांदे,रा. चोपनवाडी, पो. दिंद्रुड, ता.माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितीन शिवाजीराव शिनगारे, रा.धारुर, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
सरस्वती प्राथमिक विद्यालय, किल्ले धारुर, जि. बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नितीन शिवाजीराव शिनगारे | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड. टी.जी.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,सरस्वती प्राथमिक विद्यालय, धारुर, जि. बीड - श्री. तरकसे चंद्रकांत नारायणराव | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी, (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी आयोगासमोर युक्तिवाद सादर केला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. शिवाजी मनोहर शिनगारे यांची सन १९९२ सालची त्यांची सेवाविषयक माहिती एकूण आठ मुद्यांद्वारे मागितली आहे. त्यापैकी जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.१,२,४,५ व ८ या मुद्यांसंदर्भातील माहिती अपिलार्थीस दि.१०.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळवून प्रतिसाद दिलेला आहे. जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही ती ते देऊ शकलेले नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जि.प.बीड यांनी मुद्देनिहाय सुनावणी घेऊन जी माहिती देय होत आहे, ती माहिती देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक होते. म्हणजे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, ती माहिती देण्याबाबत स्पष्ट झाले असते. माहितीच्या अर्जावर सत्वर कार्यवाही होण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे जन माहिती अधिकारी नेमलेले आहेत ही बाब भविष्यात जन अपिलीय अधिकारी यांना लक्षात ठेवावी लागेल. अपिलार्थी यांना मुद्दा क्र. ३,६ व ७ संदर्भात माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थी यांना ऑडीट रिपोर्टची आवश्यकता आहे, असे दिसून येत आहे या माहितीकरिता अपिलार्थी शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.बीड अथवा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड यांच्याकडे स्वतंत्र अर्ज दाखल करु शकतात.

या सर्व बाबी पाहता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन शिवाजीराव शिनगारे, प्रतिभानगर, केज रोड, धारुर, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,सरस्वती प्राथमिक विद्यालय,धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. के. ना. जेटेवाड, : अपिलार्थी
कार्यालय तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालय अधिक्षक,
भूमि अभिलेख, लातूर, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यालय अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. के. ना. जेटेवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, लातूर - श्री. डी.पी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर - श्री. सुनिल पं.शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, तत्कालीन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांना दि. ०५.०१.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये त्यांच्या स्वतःच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात एकूण १५ मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यांनी माहिती अर्ज केला त्यावेळी त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली नव्हती. सदरच्या माहितीसंदर्भातील नस्ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असतानाही त्यांनी माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे की, त्यांची नस्ती पुणे येथे पाठविण्यात आली व उपलब्ध झाल्यानंतर देण्यात येईल. तदनंतर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांच्याकडे प्रथम अपील दि.१७.०२.२०१० रोजी सादर केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०४.२०१० रोजी सुनावणी घेतली, त्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. त्यांना माहिती उपलब्ध नाही म्हणून देता येत नाही व जी माहिती उपलब्ध आहे त्याची पाहणी करावी, असा निर्णय दिला. त्यांनी पाहणी केली. तथापि त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांनी युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थीच्या दि. ०५.०१.२००९ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०१.२००९ रोजी माहिती उपलब्ध नाही असे कळवून प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. त्यांच्या कार्यालयात अपिलार्थी यांनी सादर केलेल्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणी घेऊन दि. २८.०४.२०१० रोजी निर्णय दिला आहे. सुनावणीच्या वेळी उपलब्ध धारिका पाहणीसाठी उपलब्ध करुन दिल्या. त्यांना आवश्यक असलेली माहिती या धारिकेत नाही, असे अपिलार्थी यांनी सांगितले.

वरील सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी यांनी दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करावा. सदर कर्मचारी शक्यतोवर दुसऱ्या कार्यालयातील असावेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात सर्व संचिकांची पाहणी करावी व त्यासंदर्भात दैनंदिन रोजनिशी अहवाल ठेवावा व कागदपत्रे उपलब्ध झाल्यास अपिलार्थी यांना विनामूल्य देण्यात यावीत. माहिती न मिळाल्यास त्याप्रमाणे निष्कर्ष स्पष्टपणे कळवावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. के. ना. जेटेवाड, तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,उमरी, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपिलार्थी
रा. मंगरुळ नं.१, ता. माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम)
उपविभाग,माजलगाव जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम ),
विभाग क्र.२,बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नारायण ग्यानबा बापमारे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद (बांधकाम),उपविभाग माजलगाव, जि.बीड श्रीमती पी.जी.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | उपअभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) माजलगाव उपविभाग,जि.बीड - श्री. व्ही. हनमसागर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम ),विभाग क्र.२,बीड - श्री. पी.एम.चंदनशीव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०३.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२६.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत रस्ता व नालादुरुस्ती तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक लावण्यासंदर्भात एकूण पाच मुद्यांद्वारे माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०६.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात असे कथन केले की, त्यांच्या शेताजवळ ८००-१००० मिटर रस्ता झाला. त्यावर किती खर्च झ ाला, याबाबतच्या माहितीची आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ही माहिती निरंक आहे असे कळविले आहे.अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन त्यांना पाण्याच्या प्रवाहासंदर्भात तांत्रिक अडचण आहे असे दिसून येत आहे. याकरिता कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग क्र.२,बीड यांना स्वतंत्रपणे या बाबीचा विचार करणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु.पो.मंगरुळ क्र.१, ता.माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम ),विभाग

क्र.२,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.गंमत भंडारी, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड - श्री. ए.एल.रुमणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड - श्री. आर.बी.रोडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.त्यांचा लेखी युक्तिवाद सादर करण्यात आला. तो दाखल करुन घेण्यात आला. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी युक्तिवाद सादर केला.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये विहित केलेल्या तक्त्यात माहिती तयार करुन द्यावी, अशी मागणी केली होती. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचा कालावधी दि. ०१.०१.२००७ ते २०.११.२००९ असा आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांनी दि. २२.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जी माहिती उपलब्ध आहे ती पुरविणे अभिप्रेत आहे, त्या माहितीचे संकलन, संशोधन, पृथक्करण करुन देणे अभिप्रेत नाही, असे कळविले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी पुनश्च् अर्ज केल्यास देय माहिती विहित मुदतीत देण्याची कार्यवाही करणे शक्य होईल अथवा हवी असलेली उपलब्ध माहितीची पाहणी देण्यात येईल, असेही कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्याकडे अपिलार्थी यांनी प्रथम अपील दाखल केले त्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांच्या वकिलांनी लेखी बाजू खालीलप्रमाणे मांडली असल्याचे दिसून येत आहे.

"-----२) अपिलात सर्व मुद्यांचे कथन केलेले आहे. उपलब्ध माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात देण्याचे आदेश माहिती अधिकारी यांना द्यावेत."

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,बीड यांनी सर्व बाबींचा विचार करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे अभिलेखे ज्या स्वरुपात उपलब्ध असतील त्या स्वरुपात विहीत शुल्काचा भरणा करुन अपिलकर्त्यास पुरवावेत, असे जन माहिती अधिकारी यांना दि.२०.०१.२०१० रोजी झालेल्या सुनावणीमध्ये सूचित केले. त्यानुसार अपिलार्थीस दि. २७.०१.२०१० रोजी शुल्क रु.१२६४/- चा भरणा करावा, असे कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

या सर्व बाबी विचारात घेता तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कलम २(च)मधील माहितीच्या व्याख्येनुसार जी माहिती उपलब्ध आहे, ती माहिती देणे अभिप्रेत आहे. संस्करण करुन देता येत नाही.जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिलेला दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात द्यावी, असे कळविल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्या दि. २७.०१.२०१० रोजीच्या पत्रानुसार शुल्काचा भरणा केला नाही. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे दिसून येत नाही. अतः अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करावा व माहितीच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात किंवा माहितीची पाहणी करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अपिलार्थी यांनी सदरच्या कार्यवाही संदर्भातील निर्णय पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावा.तदनंतर जन

माहिती अधिकारी यांनी पुढील पंधरा दिवसांच्या आत सशुल्क माहिती पुरविण्याची कार्यवाही करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत सशुल्क माहिती पुरविण्यासाठी कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंमत भंडारी, संपादक,दै. पार्श्वभूमी, दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.पापालाल लालचंदजी बोरा, : अपिलार्थी
रा. परळी वै.,जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (म.),
तहसील कार्यालय,परळी वैजनाथ,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, परळी वै. जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.पापालाल लालचंदजी बोरा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, त्यांना विलंबाने माहिती मिळाली आहे व ती अपूर्ण आहे. त्यांना खालील माहिती मिळाली नाही.

१) दि. ०१.०१.२००८ ते ०५.११.२००९ या कालावधीच्या तहसील कार्यालयाच्या वाहनाच्या लॉगबुकच्या प्रमाणित साक्षांकित प्रती.

२) अपिलार्थी यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १० मध्ये नमूद केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर केलेल्या कारवाईच्या तपशीलाच्या प्रती.

३) अपिलार्थी यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १२ संदर्भात तत्कालीन नायब तहसीलदार श्री. परळीकर यांच्याविरुध्द दि. १२.१०.२००५ ते अर्जाच्या दिनांकापर्यंत (दि.०५.११.२००९) या कालावधीत करण्यात आलेल्या प्रशासकीय/शिस्तभंगविषयक कारवाईच्या प्रती.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगातर्फे गंभीर दखल घेण्यात येत आहे. त्यांना बाजू मांडण्यासाठी आयोगातर्फे संधी देण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीस वरील माहितीची संचिका, वाहनाच्या लॉगबुक व आवश्यक कागदपत्रांसह त्यांना उपस्थित राहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १३.०४.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. पापालाल लालचदजी बोरा, द्वारा तुलसी क्लिनिक, स्टेशन रोड, परळी वै.,

जि.बीड- ४३१ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परळी वै. जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कांबळे राहुल गोरोबा, : अपिलार्थी
मु. कानडी, पो. पिंपळगांव गाडे, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५५९

२ सुनावणीची तारीख दि. २९-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-१२-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०१-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात सद्यस्थिती अवगत होऊ शकत नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २५-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे राहुल गोरोबा, मु. कानडी, पो. पिंपळगांव गाडे, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामकिशन पंढरीनाथ खिळे, | : | अपिलार्थी |
| २ | श्री. शिंदे राजू लक्ष्मण,<br>रा. बेलगांव (मांडवी), तालुका आष्टी, जिल्हा बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | उपस्थित (२) |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड - श्री. ए. बी. गांगर्डे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड - श्री. एस. एम. गोलेकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी (२), जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सन २००७ ते २००९ या कालावधीतील मौजे बेलगाव, तालुका आष्टी येथील कृषि विभागामार्फत पाणलोट क्षेत्राअंतर्गत झालेल्या कामाबाबतची माहिती मागितली आहे.

अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती दिनांक २०-०२-२०१० च्या पत्रान्वये साध्या पोस्टाने पाठविण्यात आली आहे. तथापि अपिलार्थीने माहिती न स्विकारल्याने सदर माहितीचे हे पाकीट परत आले आहे.अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २६-०३-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व सुनावणीमध्ये माहिती पुन्हा पाठवावी असा निर्णय घेण्यात आला. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी सदर माहितीचा संच सोबत आणला आहे.अपिलार्थी यांना माहितीचा संच आयोगासमोर देण्यात आला. अपिलार्थीने हा माहितीचा संच स्विकारला आहे व या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याचे मान्य केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकिशन पंढरीनाथ खिळे, रा. बेलगांव (मांडवी), तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. श्री. शिंदे राजू लक्ष्मण, रा. बेलगांव (मांडवी), तालुका आष्टी, जिल्हा बीड.

३. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुग्रीव काळे,<br>विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>सहायक निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ श्री. बी. आर. माळी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०५-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०६-२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-११-२००७<br>पुणे खंडपीठाकडे प्राप्त<br>०६-०४-२०१०<br>औरंगाबाद खंडपीठाकडे प्राप्त |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी दिनांक १५-०२-२०१२ च्या पत्रान्वये कागदपत्रे पुरावे जोडत आहे, त्या आधारे वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा असे आयोगास कळविले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली व दिनांक २३-०८-२००७ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलकर्ते तारखेस हजर न झाल्यामुळे ते याबाबत गंभीर असल्याचे दिसून येत नाही म्हणून अपील खारीज करण्यात येत आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या मुद्दयाबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, त्यांना देण्यात आलेली माहिती इत्यादीबाबत कारणमिंमासेसह निर्णय कागदपत्राच्या आधारे देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी तसे केल्याचे आढळून येत नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २८-०५-२००७ च्या माहिती अर्जान्वये खालील माहिती अपेक्षिली आहे असे दिसून येत आहे.

१. दिनांक १८-०४-२००७ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत (action taken report)

२. अपिलार्थी यांच्या दिनांक ११-०४-२००७ च्या अर्जावर घेतलेल्या निर्णयाच्या टिपणीची प्रत व निर्णय घेणा-या अधिका-याचा तपशील.

३. अपिलार्थी यांचा अर्ज निकाली काढण्यासाठी शासनाने विहित केलेल्या कालावधीबाबत नियम, निर्णय, अधिसूचना, इत्यादीची प्रत.

यासंदर्भात अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार त्यांना देय होणारी माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे किंवा इत्यादी बाबी जन अपिलीय अधिकारी यांनी पहाव्यात व अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन अपिलावर परत सुनावणी घेऊन आदेश पारीत करावे.

याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुग्रीव काळे, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी, सहायक निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बबन अर्जुन दळवी,<br>रा. केळ पिंपळगांव, पो. दौलावडगांव, तालुका आष्टी,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बबन अर्जुन दळवी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड - श्री. आर. एम. मोटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड - श्री. अे. एस. कदम | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - श्री. अे. ओ. घोलकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-१२-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०८-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व तत्कालीन व सध्याचे जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००८ या कालावधीतील श्रीधर गुंड ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था, धानोरा, तालुका आष्टी, जिल्हा बीड बाबत विविध मुद्दयावर जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्याकडे मागितली आहे. यापैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे व जी माहिती २ (च) नुसार माहितीच्या व्याख्येत नमूद केलेली खाजगी निकायाशी संबंधित अशी माहिती अपिलार्थीस देय आहे व ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ०८-०१-२०१० रोजी अपील अमान्य करण्याचा निर्णय घेतला आहे असेही दिसून येत आहे. सहकारी पतसंस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी दिलेला आहे, तसेच राज्य माहिती आयोगानेही निर्णय दिलेले आहेत. या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या झालेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बबन अर्जुन दळवी, रा. केळ पिंपळगांव, पो. दौलावडगांव, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गोपाल रामराव आघाव, : अपिलार्थी
व्दारा, व्यंकटेश स्टोअर्स, किराणा लाईन, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भिलेगांव, मलनाथपूर,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गोपाल रामराव आघाव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भिलेगांव, मलनापूर,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-०१-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना विलंबाने माहिती मिळाली आहे तसेच काही माहिती अपूर्ण मिळाली आहे. त्यामध्ये मुद्दा क्रमांक २०, २१ व २२ या मुद्दयांची माहिती मिळाली नाही.

वरील मुद्दयांच्या माहितीसंदर्भात मुद्दा क्रमांक २० आणि २२ बाबतच्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल. माहिती उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे अपिलार्थीस कळवावे लागेल. मुद्दा क्रमांक २१ बाबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द असलेल्या चौकशीबाबत माहिती मागितली आहे. तथापि ही माहिती त्यांच्या वरिष्ठांकडे मागणे उचित ठरते.

अपिलार्थी यांनी एकूण २२ मुद्दयांवर माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी ग्रामसेवक आहेत. त्यांच्याकडे असलेले मनुष्यबळ आणि साधनसामग्री विचारात घेता त्यांचा माहिती अर्ज दिनांक ०७-११-२००९ अन्वये मागितलेली माहिती दिनांक ११-०१-२०१० रोजी देण्यात आली आहे असे दिसून येत आहे. भविष्यात जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जांवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित कालावधीमध्ये प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाल रामराव आघाव, व्दारा, व्यंकटेश स्टोअर्स, किराणा लाईन, परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भिलेगांव, मलनापूर, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

१ श्री. पोकळे बाळू लक्ष्मण, : अपिलार्थी

२ श्री. पोकळे गणेश रघुनाथ,

३ पोकळे अनिल गबाजी, रा. बेलगांव (मांडवा),

तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

तालुका कृषि अधिकारी, कृषि विभाग कार्यालय, आष्टी,
तालुका आष्टी, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, आष्टी,

तालुका आष्टी जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६४

२ सुनावणीची तारीख दि. २९-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : उपस्थित (३)

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

कृषि अधिकारी, कृषि विभाग कार्यालय, आष्टी,

तालुका आष्टी, जिल्हा बीड - श्री. ए. बी. गांगर्डे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

तालुका कृषि अधिकारी, कृषि विभाग कार्यालय, आष्टी,
तालुका आष्टी, जिल्हा बीड - श्री. एस. एम. गोलेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १६-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी (३), जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी त्यांच्या दिनांक १५-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये सन २००७ ते २००९ या तीन वर्षाच्या कालावधीतील मौजे बेलगाव, तालुका तालुका आष्टी येथील कृषि विभागामार्फत पाणलोट क्षेत्राअंतर्गत झालेल्या कामाबाबतची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या अर्जासंदर्भात दिनांक १८ फेब्रुवारी २०१० रोजी रुपये ४३ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे साध्या पोस्टाने कळविले आहे व त्याची नोंद त्यांच्याकडील आवक जावक नोंदवहीमध्ये आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२०१० रोजी प्रथम अपील केले. त्यावर दिनांक २६-०३-२०१० रोजी सुनावणी झाली. सुनावणीमध्ये अपिलार्थीकडून शुल्काचा भरणा करुन घेऊन माहिती द्यावी असा निर्णय झाला. तदनंतर अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती दिनांक ३१ मार्च २०१० रोजी पाठविण्यात आली आहे. तथापि अपिलार्थीने माहिती न स्विकारल्याने सदरचे पत्र परत आलेले आहे. आयोगाने सूचित केल्यानुसार आज रोजी आयोगासमोर अपिलार्थीस ही माहिती देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्विकारली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पोकळे बाळू लक्ष्मण, रा. बेलगांव (मांडवा), तालुका आष्टी, जिल्हा बीड

२. श्री. पोकळे गणेश रघुनाथ, रा. बेलगांव (मांडवा), तालुका आष्टी, जिल्हा बीड

३. पोकळे अनिल गबाजी, रा. बेलगांव (मांडवा), तालुका आष्टी, जिल्हा बीड

४. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कृषि विभाग कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कृषि विभाग कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ओमप्रकाश मालपाणी,<br>पुर्णावादी बँकेच्या पाठीमागे, माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,<br>औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण<br>संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ओमप्रकाश मालपाणी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. माधव जुमडे,<br>सहायक शिक्षण संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण<br>संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २४-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २४-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना न मिळाल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दिनांक २४-०२-२०१० अन्वये प्रथम अपील सादर केले आहे. त्यावर शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे प्रथम अपील त्यांच्या दिनांक ०५-०३-२०१० च्या पत्रान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडे पाठवून त्यावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याबाबत कळविले आहे व ही बाब अपिलार्थीसही कळविण्यात आली आहे. तथापि या अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही.

याकरिता प्रकरण सुनावणी घेऊन निर्णय घेण्याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ओमप्रकाश मालपाणी, पुर्णावादी बँकेच्या पाठीमागे, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोमीन अब्दुल कवी, : अपिलार्थी
जुना बाजार, हाफीज गल्ली, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा, ईस्लामपुरा, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोमीन अब्दुल कवी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा, ईस्लामपुरा, बीड - श्री. ईनामदार रज्जुउद्दीन रईसउद्दीन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड<br>- श्री. एस. आर. सानप | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. महम्मद याहीया जुबेर पि. अब्दुल खालेक हे सन २००० पासून सह शिक्षक या पदावर कार्यरत आहेत परंतु त्यांना वेतन मिळालेले नाही याबाबत माहिती मागितलेली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा, ईस्लामपुरा, बीड यांनी दिनांक ०३-०२-२०१० रोजी अपिलार्थीस पाठविली आहे व अपिलार्थीस ती प्राप्त झाली आहे. या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोमीन अब्दुल कवी, जुना बाजार, हाफीज गल्ली, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा, ईस्लामपुरा, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बी. बी. सिरसट, | : | अपिलार्थी |
| | गजानन नगर, नाळवंडी रोड, बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | तलाठी सज्जा, पिंगळे, बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | तहसीलदार, बीड | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बी. बी. सिरसट | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | तलाठी सज्जा, बीड पिंगळे, तालुका जिल्हा बीड | | |
| | - श्री. शेळके आर. एस. | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. ०९-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना खालील मुद्दयांची माहिती प्राप्त झालेली नाही.

१. अपिलार्थी यांची स्वतःची जमीन जप्त करण्यासाठी देण्यात आलेल्या नोटीसीची प्रत.

२. वरील नोटीस तहसील कार्यालयाकडून तलाठी यांच्याकडे ज्या दिनांकास प्राप्त झाली तो दिनांक, आवक जावक प्रत.

३. सदरहू जमिनीवर त्यावेळी कोणाचा कब्जा होता त्याचा तपशील.

४. वरील बाबींच्या झालेल्या पंचनाम्याची प्रत.

५. वरील पंचनाम्याची प्रत तहसील कार्यालयास ज्या दिनांकास सादर केली तो दिनांक, सादर केल्याचा तपशील व ज्या पत्रान्वये सादर केली त्याची प्रत.

६. उपरोक्त पंचनामा ज्या इसमाने लिहिला त्याचे नांव.

७. ७/१२ मध्ये नोंद घेण्याच्या कालावधीबाबत शासन निर्णयाची प्रत.

वरील माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देण्यासाठी तहसीलदार, बीड यांना तलाठी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

या प्रकरणात अपिलार्थीचा माहितीचा अर्ज दिनांक २६-११-२००९ चा आहे. त्यांनी मागितलेली माहिती संबंधित तलाठी यांनी दिलेली नाही, माहिती देण्यास विलंब का झाला याबाबतची सखोल चौकशी तहसीलदार, बीड यांनी करुन संबंधित तलाठी यामध्ये दोषी आढळल्यास त्याबाबत पुढील कार्यवाही योजावी.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेताना दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत आहे. ही बाब अयोग्य होती. जन अपिलीय अधिकारी यांनी कारणमिंमासेसह निर्णय देणे आवश्यक आहे. याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी भविष्यात दक्ष राहावे, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांनी संबंधित तलाठी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दिलेली नाही, माहिती देण्यास विलंब का झाला इत्यादीची सखोल चौकशी करुन संबंधित तलाठी यामध्ये दोषी आढळल्यास त्याबाबत पुढील कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. बी. सिरसट, गजानन नगर, नाळवंडी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी सज्जा, बीड पिंगळे, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाप्पासाहेब महादेव शिंदे, : अपिलार्थी
मु. पो. लवुळ नंबर १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लवुळ नंबर १,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाप्पासाहेब महादेव शिंदे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लवुळ नंबर १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. अे. आर. चाळक | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. गुळभिले डी. आर. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांच्याकडील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे अपील परत घेत असल्याबाबत लेखी निवेदन अपिलार्थीने सादर केल्यामुळे प्रकरण निकाली काढले आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात सदरचे अपील मागे घेण्यात आलेले नाही असे सांगितले. ही बाब विचारात घेता या प्रकरणी राज्य माहिती आयोगास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) नुसार प्राप्त अधिकारानुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घ्यावे व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात मुद्देनिहाय निर्णय कारणमिमांसेसह पारीत करावा. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

अत:आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाप्पासाहेब महादेव शिंदे, मु. पो. लवुळ नंबर १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लवुळ नंबर १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लहाने कुंडलिक भागवतराव, रा. औरंगपुर, पो. सिरसाळा, तालुका परळी वै., जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वै., जिल्हा बीड | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वै., जिल्हा बीड | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लहाने कुंडलिक भागवतराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की,त्यांना माहिती मिळाली आहे, तथापि ती अपूर्ण मिळाली असल्याचे प्रतिपादन केले.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, दि.२६.१०.२००९ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी मौजे सिरसाळा ता.परळी वै.,जि.बीड येथील गट नं. ४१३, ४२०,४१४,४०५,४२१ मधील पिकपेरा, फेरफार इ. बाबत विविध मुद्यांद्वारे सन १९८६-८७ ते २००९-१० या कालावधीची विस्तृत अशी माहिती मागितलेली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा, शिरसाळा यांनी दि. १७.०२.२०१० रोजी प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,परळी वै.जि.बीड यांनी दि. ०९.०३.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी तलाठयाकडे फेरफार रजिस्टरची पाहणी करुन आवश्यक असणारे फेरफार क्रमांक नमूद करुन वेगळा अर्ज करुन तलाठी यांचेकडून माहिती हस्तगत करावी. संबंधित तलाठयाने अपिलकाराने मागणी केल्यानंतर माहिती तात्काळ ८ दिवसात संबंधितास उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी सन १९८६-८७ ते २००९-१० अशी सुमारे १५ वर्षांची माहिती मागितली आहे. माहितीची व्याप्ती विचारात घेता अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.याकरिता अपिलार्थीस पाहणी देणे योग्य ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस माहितीची पाहणी द्यावी व त्यातून आवश्यक काही कागदपत्रे विनामूल्य द्यावीत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा सिरसाळा, ता.परळी वै.,जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुंडलीक भागवतराव लहाने, मु.औरंगपूर, पो. सिरसाळा, ता.परळी वै., जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा सिरसाळा, ता.परळी वै. जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वै., जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संदीपान आप्पाराव थोरात, : अपिलार्थी
रा. किल्ले धारुर, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संदीपान आप्पाराव थोरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी. एन. वांजरखेडकर, अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड - श्री. एन.टी.जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. ०७.११.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये दि. ०१.०१.२००२ ते अर्जाच्या दिनांकापर्यंत मौ. पांगरी, वाघोली या गावातील पोलीस पाटील नेमणूकीसंदर्भातील माहिती एकूण सात मुद्यांद्वारे मागितली आहे. अपिलार्थी यांचा सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.१२.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कलम ७(१) नुसार दि. ११.०१.२०१० रोजी प्रथम प्रतिसाद दिला असून मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात आहे तसेच उपलब्ध असलेली माहितीच पुरवणे अभिप्रेत असून माहितीचे संकलन, संशोधन,पृथक्करण करुन माहिती देणे अभिप्रेत नाही, असे कळविले आहे. तथापि संदर्भित विषयाच्या संचिका कार्यालयीन वेळेत पाहणी करण्यास मिळू शकतात, असेही कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे झालेल्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,६व ७ संदर्भातील माहिती त्यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी त्यांना ही माहिती मिळाल्याचे मान्य केले. अपिलार्थी यांना मुद्दा क्र. २,३,४ व ५ संदर्भातील माहिती मिळालेली नाही, असे त्यांनी युक्तिवादात प्रतिपादन केले. मुद्दा क्र. २ ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसून पोलीस विभागाच्या कार्यालयात उपलब्ध असते, असे जन अपिलीय अधिकारी यांनी कथन केले. अतः उर्वरित मुद्दा क्र. ३,४ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या माहिती अर्जातील उर्वरित मुद्दा क्र. ३,४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदीपान आप्पाराव थोरात, द्वारा मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड किल्लेधारुर,जि. बीड - ४३१ १२४.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. आशीफ नुरमहंमद शेख,<br>रा. यळंब (ब्रम्हनाथ), तालुका शिरुर (कासार),<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आशीफ नुरमहंमद शेख | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, त्यांना माहिती मिळाली नाही व त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.) यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. यासाठी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या दि.१०.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड श्री. पवार यांनी पंधरा दिवसांच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१०.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, पंधरा दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आशीफ नुरमहंमद शेख, मु. पो.यळंब (ब्रम्हनाथ), ता.शिरुर(कासार), जि.बीड

२. जन माहिती अधिकारी,शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री.अजित एम. देशमुख,<br>कारंजा रोड, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, केज, जि.बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, जि.बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. थोरात संदीपान आप्पाराव | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत केज, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, केज, जि.बीड-श्री. गिरी एस.पी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.०३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगासमोर कथन करण्यात आले की, केज ग्रामपंचायत कार्यालयाचे आता नगर पंचायत, केज असे रुपांतर झाले आहे. प्रकरणात दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा आयोगातर्फे निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी संबंधित सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १३.०४.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. अजित एम.देशमुख, द्वारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, ता.जि.बीड - ४३१ १२२

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सध्याचे जन माहिती अधिकारी, नगर परिषद, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हनुमंत देवराय गडदे,<br>रा. मलनाथपूर, तालुका परळी वै.,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वै.,<br>तालुका परळी वै., जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वै., तालुका परळी वै., जिल्हा बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणात सद्यस्थिती अवगत होऊ

शकली नाही. या करिता प्रकरण तहसीलदार, परळी वै.,जि.बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. सद्यस्थिती अवगत करण्याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परळी वै., जि.बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर यापूर्वी सुनावणी घेतली असली तरी पुन्हा सुनावणी घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित निर्णय पारित करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,परळी वै.,जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.हनुमंत देवराव गडदे, मु. मलनाथपुर, पो.सिरसाळा, ता.परळी वै.,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वै., तालुका परळी वै., जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,परळी वै.,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रमेश दत्तात्रय राऊत, रा. बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्रीमती सी. के. कुलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.डी.सोनवणे, जनसंपर्क अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७.०४.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी दि. २९.०२.२०१२ अन्वये सादर केलेला लेखी युक्तिवाद विचारार्थ दाखल करुन घेण्यात आला.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि. ०१.११.२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत शुल्क ₹१००/- भरणा करावे, असे अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे कळविण्यात आले आहे. त्यामध्ये खर्चाचा तपशील दिला आहे. त्याचप्रमाणे प्रश्नार्थक माहिती देय होत नाही व माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देणे अभिप्रेत आहे असेही कळविले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करण्याकरिता प्रतिसाद दिलेला नाही. त्यांनी पुढे असेही कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी दि. १५.०१.२०१०, ०८.०३.२०१० व १५.०३.२०१० रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी उपस्थित न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यावर पंधरा दिवसात माहिती द्यावी, असा निर्णय दिला आहे. यावरही अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

अपिलार्थी यांच्या लेखी युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, प्रथम अपिलाचा निर्णय त्यांना दि. ०९.०४.२०१० रोजी प्राप्त झाला व त्यामध्ये शुल्काची रक्कम अदा केल्यावर पंधरा दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी, असे नमूद केले आहे. तथापि त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. यासाठी आवश्यक माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांनी प्रथमतः पंधरा दिवसांच्या आत शुल्काचा भरणा करावा व तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यास जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस पुढील पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश दत्तात्रय राऊत,राऊत सदन, जुनी भाजी मंडई, बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.तुषार अशोकराव फड,<br>रा. धर्मापुरी, ता. परळी वै., जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,परळी वै.,जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.तुषार अशोकराव फड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. जन

माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी संधी देण्यात येत आहे. सदर प्रकरणात आयोगातर्फे सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १७.०४.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.तुषार अशोकराव फड, मु.पो. धर्मापुरी, ता. परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नानासाहेब रामचंद्र मोरे, : अपिलार्थी
रा. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई,
जि. बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोरेवाडी,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७६

२ सुनावणीची तारीख दि. २९-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. नानासाहेब रामचंद्र मोरे : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोरेवाडी, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड - श्री. देशमुख व्ही.बी. : उपस्थित

३.३ तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. जे.एस.पोटभरे : उपस्थित

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड : अनुपस्थित

३.५ जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.परळीकर एस.बी., कक्ष अधिकारी : उपस्थित

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ३०.१२.२००९ रोजीच्या अर्जान्वये एकूण १४ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००७-२००९ असा सुमारे तीन वर्षाचा आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोरेवाडी, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी दि. २५.०१.२०१० रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपात असल्यामुळे कलम ७(९) अन्वये माहितीची पाहणी कार्यालयात उपस्थित राहून करावी, असे कळविले आहे. यावर पुढे कार्यवाही झालेली आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणी घेऊन अपिलार्थीस दि. ३१.०३.२०१० पूर्वी १४ मुद्यांवर माहिती द्यावी, असा निर्णय दिला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप तसेच कालावधी विचारात घेता अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.यासाठी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी देणे योग्य ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर माहितीची पाहणी द्यावी असा निर्णय घेणे, योग्य ठरले असते.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य

द्याव्यात तसेच अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोरेवाडी, ता.अंबाजोगाई, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नानासाहेब रामचंद्र मोरे,मु. पो. मोरेवाडी, ता.अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोरेवाडी, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्तात्रय ठकाजी सातपुते,<br>रा. डोगरकिन्ही, तालुका पाटोदा, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, पाटोदा, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्तात्रय ठकाजी सातपुते | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थीचे वकील ॲड. एस.एस.मोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, पाटोदा, जिल्हा बीड - श्री. शिवाजी विश्वनाथ चव्हाण | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पाटोदा, जि.बीड - श्री. खंडागळे व्ही.बी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की,अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १०.०९.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मौ. तुपेवाडी तहत डोंगरकिन्ही येथील महाजल पाणीपुरवठा योजनेबाबत पूर्ण तपशीलवार माहिती जसे पाणी पुरवठाबाबत विहीर, पाईपलाईन, पाणी टाकी व गावातील नळयोजनांचे अंदाजपत्रकक, इ.बाबतची माहिती मागितली आहे. या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, पाटोदा, जि. बीड यांनी दि. ११.०९.२००९ रोजीच्या पत्रान्वये ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरकिन्ही ता.पाटोदा यांना माहिती द्यावी, असे कळविले आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा, जि.बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दि. २२.०२.२०१० रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती द्यावी असे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही, असे त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांनी कथन केले.

या सर्व बाबी पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब का झाला याची चौकशी गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा, जि.बीड यांनी करावी. आज रोजी अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी. त्यामध्ये काही अपूर्ण आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन पुढील पंधरा दिवसात अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी. त्याचप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यास सुमारे दोन वर्षांचा विलंब झाल्याचे दिसून येत आहे. याकरिता संबंधित उपअभियंता श्री. आर.एन.ढवळे व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांचा खुलासा प्राप्त करुन घ्यावा व विलंबाची कारणे शोधावी व दोषी आढळल्यास संबंधितांविरुध्द यथोचित चौकशीची कारवाई योजावी. गट विकास अधिकारी, पं.स.पाटोदा यांनी ही कार्यवाही तीन महिन्याच्या आत पूर्ण करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे चौकशीची कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीन महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय ठकाजी सातपुते, मु.पो. डोंगरकिन्ही, ता.पाटोदा, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, पाटोदा, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पाटोदा, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गाढे लक्ष्मण तुळशीराम, रा. बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्रीमती अंधारे तृप्ती विक्रम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड - श्री. एस.आर.सानप | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद,बीड उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे पंचायत समिती, माजलगाव अंतर्गत तालुकास्तरीय सर्व शिक्षा अभियान तालुका स्तरीय राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांसंदर्भात सुमारे चार वर्षे कालावधीची विस्तृत माहिती मागितली आहे. त्यापैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली काही माहिती अपिलार्थीस यापूर्वी देण्यात आली आहे. उर्वरित माहिती संबंधित लेखाधिकारी यांच्याकडून कार्यभार हस्तांतरण झाला नव्हता त्यामुळे आतापर्यंत देता आली नाही. आता ही समस्या दूर झाली असून ही माहिती अपिलार्थीस त्या देऊ शकतात.

अपिलार्थी यांच्या माहितीच्या अर्जामध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व कालावधी विचारात घेता उर्वरित माहितीची पाहणी अधिनियमातील कलम ७(९) नुसार देणे योग्य ठरत आहे.

प्रसंगावशात आयोगासमोर कथन करण्यात आले की, अपिलार्थी हे सेवानिवृत्तीपूर्वी त्यांच्या विभागामध्ये गट शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत होते, तसेच त्यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यकाळातील आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माजलगाव, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन उर्वरित माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गाढे लक्ष्मण तुळशीराम, रा. पालवण रोड, बाळराजे किराणा दुकानाचे पाठीमागे,

बीड, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव,जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.